वर्ष ४६
अंक ४

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

**समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक**

एप्रिल २०२६
चैत्र/ वैषाख
शके १९४८

नमस्कार मंडळी,

वसंत ऋतूचे आगमन झाले आहे आणि नुकताच आपण गुढीपाडवा उत्साहात साजरा केला. तुम्हा सर्वांना मराठी नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! हे नवे वर्ष तुम्हा सर्वांना सुखासमृद्धीचे आणि भरभराटीचे जावो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

गेल्या महिन्यात आंतरराष्ट्रीय पातळीवर काही चिंताजनक घडामोडी पाहायला मिळाल्या. इराण सोबतच्या युद्धामुळे आखाती देशांमधून प्रवास करणाऱ्या अनेक भारतीय प्रवाशांना गैरसोयींचा सामना करावा लागला. युद्धाच्या परिस्थितीमुळे तेलाच्या किंमती वाढण्याची शक्यता असून परिणामी महागाई अधिक वाढू शकते. ही परिस्थिती लवकरात लवकर शांत व्हावी, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

गेल्या महिन्यातील एक महत्त्वाची घडामोड म्हणजे बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संमेलनाचे संयोजक श्री. मोहित चिटणीस यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांची घेतलेली भेट. या भेटीदरम्यान त्यांनी मुख्यमंत्री, तसेच त्यांच्या पत्नी, सौ. अमृता फडणवीस यांना आगामी संमेलनासाठी आमंत्रित केले असून, आनंदाची बाब म्हणजे त्यांनी हे आमंत्रण स्वीकारले आहे.



मार्च महिना बृहन्महाराष्ट्र मंडळासाठी अत्यंत कार्य व्यस्त ठरला. ८ मार्च रोजी, “आंतरराष्ट्रीय महिला दिना” निमित्त आयोजित चर्चासत्राद्वारे भारतातील “आशा” कार्यकर्त्यांसाठी निधी संकलनाची मोहीम सुरू करण्यात आली. सहा मंडळांनी सहभाग घेत आत्तापर्यंत $६,००० पेक्षा अधिक निधी जमा केला आहे. हा निधी “मैना फाउंडेशन”मार्फत नागपूरजवळील ग्रामीण भागातील महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाविषयी जनजागृती, वैद्यकीय तपासण्या आणि उपचारांसाठी वापरण्यात येणार आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळ, BVG या संस्थेसोबत एक महत्त्वपूर्ण सहकार्य करण्याच्या विचाराधीन आहे. या उपक्रमाद्वारे उत्तर अमेरिकेतील मराठी बांधवांना भारतात गेल्यावर आवश्यक असलेल्या विविध सेवा सुलभ आणि परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. उदाहरणार्थ: विमानतळ सहाय्य, देवदर्शन व्यवस्था, मेडिकल टुरिझम, ज्येष्ठ नागरिकांची वैद्यकीय सेवा, तसेच मालमत्ता व्यवस्थापन इत्यादी. याच उपक्रमांतर्गत दरवर्षी सुमारे शंभर विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये “इंटर्नशिप”च्या संधी उपलब्ध करून देण्याची योजना आहे.

आम्हाला सांगताना आनंद होत आहे की बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मोबाईल ॲप विकसित करण्याचे काम सुरू आहे. या ॲपद्वारे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे विविध कार्यक्रम - जसे की, उत्तररंग, मेडिटेशन, तत्त्वज्ञान कार्यक्रमांची सत्रे, तसेच शाळा आणि स्पर्धांची माहिती सहज उपलब्ध होईल. यातील विशेष बाब म्हणजे प्रत्येक स्थानिक मंडळालाही या ॲपमध्ये स्वतःचा विभाग असेल, ज्यामधून ते आपल्या कार्यक्रमांची माहिती, सूचना आणि बदल थेट आपल्या सभासदांपर्यंत पोहोचवू शकतील. यामुळे संवाद अधिक सुलभ आणि प्रभावी होईल. तसेच, या ॲपमुळे मंडळांना जाहिरातींद्वारे आर्थिक उत्पन्न मिळवण्याची संधीही उपलब्ध होणार आहे.

उन्हाळ्याच्या सुट्टया जवळ येत आहेत आणि भारतात जाण्याची तयारी अनेकांनी सुरू केली असेल. बृहन्महाराष्ट्र मंडळ आणि भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे (BORI) - या संस्थेमध्ये प्रस्तावित सहकार्याद्वारे वैद्यकीय क्षेत्रात शिक्षण / काम करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी “इंटर्नशिप कार्यक्रम” राबविण्याचा आमचा मानस आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये १ ते ८ आठवड्यांच्या कालावधीत रुग्णालयांमध्ये प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून दिली जाईल. इच्छुक विद्यार्थ्यांनी किंवा त्यांच्या पालकांनी आमच्याशी संपर्क साधावा. अधिक माहिती या अंकात दिली आहे.

या महिन्यात बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या निवडणुकांची घोषणा करण्यात येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज वेळेत सादर करावेत, ही नम्र विनंती. तसेच सर्व मंडळ अध्यक्षांना विनंती आहे की त्यांनी BMM Awards, BMM Youth Scholarships, BMM Book Publication तसेच संमेलनासंबंधी माहिती आपल्या सदस्यांपर्यंत पोहोचवावी. आपल्या सर्वांच्या सहकार्याने आगामी संमेलन निश्चितच यशस्वी होईल, याबाबत आम्हाला पूर्ण विश्वास आहे.

तुम्हा सर्वांना येणाऱ्या हनुमान जयंती, नरसिंह जयंती आणि अक्षय्य तृतीयेच्या हार्दिक शुभेच्छा! तसेच भारताच्या घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सर्वांना विनम्र अभिवादन.

धन्यवाद.

जय हिंद - जय महाराष्ट्र!
आपला,
प्रसाद पानवळकर, अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**
बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)
संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर
अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
**BMM Treasurer - Santosh Salvi**
**4 Azalea Lane, Nashua, NH 03062**
**Ph: 603 438 9279**
**Email: santosh.salvi@bmmonline.org**

**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75

**Send your payments to: zelle@bmmonline.org**

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२४ - २०२६)**
**मताधिकार असलेले सदस्य**
अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस
सचिव: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना
कोषाध्यक्ष: संतोष साळवी, नाशुवा, न्यू हॅम्पशायर
सदस्य: पुरू ठाकरे, रिचमंड, व्हर्जिनिया
मेधा गोडबोले, क्लिव्हलँड, ओहायो
गौरव पटवर्धन, सॉल्ट लेक सिटी, युटा
राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
आनंद चौथाई, एडिसन, न्यू जर्सी
**नियुक्त सदस्य**
माजी अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो
**विश्वस्त समिती**
अध्यक्ष : नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

## या अंकात

| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती | २ |
| २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल | ३ |
| चौथे विश्व मराठी संमेलन – नाशिक | ५ |
| Amended and Restated By- Laws | ६ |
| नवचैतन्याचे अंकुर | ६ |
| राशिभविष्य | ७ |
| कविता स्पर्धा : निकाल | ७ |
| कविता: आविष्कार | ८ |
| कविता: हरि स्नेह | ८ |
| कविता: मातृप्रेम (तरु-धराचे) | ९ |
| कविता: जेव्हा आपल्या आयुष्यात प्रेम येतं.. | ९ |
| कविता: प्रेमाचे अद्वैत | १० |
| कविता: मी न माझी राहिले | १० |
| अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख | ११ |
| BMM मराठी शाळा- समूहगान स्पर्धा निकाल | १२ |
| A letter from Mother Earth | १४ |
| अलकनंदा: विश्वाच्या बाल्यावस्थेतील आकाशगंगेची जुळी | १५ |
| इंदोर व उज्जैन | १७ |
| द्वंद | १९ |
| संवेदनशील पार्थची गोष्ट | २० |
| श्री गजानन महाराज प्रकटदिन सोहळा २०२६ वृत्तांत | २१ |
| जाहिरात | २३ |
| जाहिरात | २४ |
| जाहिरात | २५ |
| जाहिरात | २६ |
| जाहिरात | २७ |
| जाहिरात | २८ |
| MANA Paintings | २९ |

## संपादक समिती

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
प्रसाद पानवळकर

हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :
Email - Vrutta@Bmmonline.org
आलेल्या प्रतिक्रियां पैकी, निवडक प्रतिक्रिया पुढच्या अंकात प्रसिद्ध केल्या जातील. शब्दमर्यादा: १०० शब्द.

# २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल

बीएमएम वृत्ताच्या सर्व वाचकांना अक्षय्य तृतीयेच्या हार्दिक शुभेच्छा! अक्षय्य तृतीया म्हणजेच चिरंतन शुभारंभाचा, समृद्धीचा आणि मंगल कार्यांचा दिवस. या पवित्र दिवशी सुरू केलेले प्रत्येक कार्य अक्षय्य फळ देत राहते, अशी श्रद्धा आहे. हाच सकारात्मक, उत्साहवर्धक आणि चिरस्थायी भाव घेऊन आपण बीएमएम २०२६ च्या तयारीकडेही वाटचाल करत आहोत, एक असा सोहळा, जो आपल्या संस्कृतीची श्रीमंती आणि नात्यांची उब अक्षय्य ठेवेल. वसंत ऋतूची चाहूल लागली आहे. वातावरणात विविध फुलांची उधळण सुरू झाली आहे. त्याचप्रमाणे बीएमएम २०२६ च्या तयारीलाही आता रंग चढू लागला आहे.



💥 मराठी नूतन वर्षाची विशेष भेट म्हणून आम्ही पहिल्या टप्प्यातील सवलतीची मुदत आता **१ मे (महाराष्ट्र दिन)** पर्यंत वाढवली आहे!

💥 संपूर्ण अधिवेशन नोंदणी: फक्त **$३५०** पासून सुरू. भोजन विरहित किंवा भोजन समाविष्ट असे वेगवेगळे तिकीट पर्याय उपलब्ध आहेत.

💥 Day 0 धमाका: विशेष दर, केवळ **$१००** (मर्यादित कालावधीसाठी)

म्हणजे काय? तर अजून वेळ गेली नाही — प्लॅन करा, मित्रमैत्रिणींना बोलवा आणि थेट सिॲटल गाठा! ✈️🌟

**आता मनोरंजनाचा रंग अजून खुलणार!**

🎭 **नवीन आकर्षणे:**

१. **मराठी नाटक - 'ऑल द बेस्ट':** मराठी रंगभूमीवर अभिनयाचा नवा इतिहास घडवणारे आणि आजही तरुणाईच्या गळ्यातील ताईत असलेले सुपरहिट नाटक अमेरिकेत प्रथमच!

२. **सांगीतिक कार्यक्रम- 'द फोक आख्यान':** 30+ कलाकारांनी सादर केलेला, महाराष्ट्राच्या मातीतील अस्सल लोककला, परंपरा आणि सुरेल संगीताचा एक अभूतपूर्व, अद्वितीय सांस्कृतिक प्रवास.

**विशेष आकर्षण:** उत्तर अमेरिकेतील कलावंतांचा कलाविष्कार

केवळ मातृभूमीतीलच नव्हे, तर उत्तर अमेरिकेतील आपल्या स्थानिक प्रतिभेचाही येथे डंका वाजणार आहे. विविध शहरांतील दर्जेदार सादरीकरणे:

१. **संगीत वस्त्रहरण (राली):** मालवणी भाषेचा ठसका आणि विनोदाची आतषबाजी असलेले लोकप्रिय नाटक.

२. **मोगरा फुलला (लॉस अँजेलिस):** थोर साहित्यिक गो. नी. दांडेकरांच्या शब्दांना उजाळा देणारे एक भावस्पर्शी दृक्-श्राव्य वाचन.

३. **हसू बाई जोरात (बे एरिया):** ११ महिला कलाकारांच्या टायमिंगने सजलेली 'स्टँड-अप कॉमेडी'.

४. **वाद्यसंगम (सिॲटल):** २५ वादकांच्या ताफ्यातून उमटणारा सुरांचा आणि तालांचा दिव्य नाद.

५. **पती गेले गं काठेवाडी (व्हँकुव्हर):** १५ कलाकारांच्या संचातील एक बहारदार लोककला प्रकार.

ह्यात अजून भर म्हणजे - ३ सर्वोत्कृष्ट एकांकिका आणि डॅलस, अटलांटा, सॅन डियेगो, युटाह, कोलंबस, व फिनिक्स येथील ६ नामांकित ढोल-ताशा पथकांचा जल्लोष! यासोबतच पोर्टलँड, शिकागो, न्यूजर्सी, ऑस्टिन, बॉस्टन आणि वॉशिंग्टन डी.सी. येथील कलाकारांचे वैविध्यपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रम असणार आहेत.



अधिवेशनाचे संयोजक **श्री. मोहित चिटणीस** यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय **श्री. देवेंद्र फडणवीस,** यांची भेट घेऊन त्यांना बीएमएम २०२६ चे औपचारिक आमंत्रण दिले. ही भेट अत्यंत सकारात्मक झाली. मुख्यमंत्र्यांनी आनंदाने आमंत्रण स्वीकारले असून ते अधिवेशनाला उपस्थित राहण्याची शक्यता खूपच उत्साहवर्धक आहे.



“तिचा सन्मान” या उपक्रमाअंतर्गत मार्च महिन्यातील पहिल्या सन्मानमूर्ती म्हणून ज्येष्ठ व ख्यातनाम गायिका **श्रीमती उषाताई मंगेशकर** आणि प्रख्यात आयएएस अधिकारी **श्रीमती अश्विनी भिडे** यांचा सन्मानपत्र तसेच कुलस्वामिनीतर्फे सुंदर पैठणी साडी देऊन गौरव करण्यात आला. उषाताई मंगेशकर यांनी भक्ती संगीत, लावणी, प्रेमगीते यांसारख्या विविध प्रकारांमध्ये तसेच हिंदी, मराठी, बंगाली, भोजपुरी, नेपाळी, आसामी आणि कन्नड अशा अनेक भाषांमध्ये आपला सुरेल ठसा



उमटवला आहे. तर श्रीमती अश्विनी भिडे यांनी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या (MMRC) व्यवस्थापकीय संचालक म्हणून मुंबई मेट्रो लाईन ३ (Aqua Line) या महत्त्वाकांक्षी भूमिगत प्रकल्पाचे यशस्वी नेतृत्व केले आहे. त्यांच्या कार्यामुळे त्या "मुंबईच्या मेट्रो वूमन" म्हणून ओळखल्या जातात.

**एकांकिका स्पर्धा – "नाट्यसृजन"चा आढावा**

सिॲटल बीएमएम २०२६ साठी घोषित केलेल्या एकांकिका स्पर्धा 'नाट्यसृजनला' अतिशय उत्तम प्रतिसाद दिल्याबद्दल प्रथम सर्व स्पर्धक नाट्यकर्मींचे मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार!

विविध शहरांमधून पंधरापेक्षा जास्त, वेळापत्रकानुसार सादर केलेल्या प्रवेशिका आमच्याकडे प्राप्त झाल्या. विषयांचे वैविध्य कौतुकास्पद होते. तांत्रिक बाबी, अभिनय, भाषा, माध्यम आणि सादरीकरणावरील पकड हे सर्वच वाखाणण्याजोगे होते; काही बाबी तर विशेष उल्लेखनीय ठरल्या. स्पर्धेच्या अनुषंगाने स्वतःचे वेगळेपण दिसावे याची जाणीवपूर्वक काळजी बहुतेकांनी घेतलेली दिसली. नाट्य हा एक सांघिक अनुभव आहे आणि या कलेवर मनापासून प्रेम व ओढ असल्याशिवाय तो साकारत नाही. 'नाट्यसृजन' हा त्याचाच एक सुंदर प्रयत्न आहे. उपांत्य फेरीसाठी आठ एकांकिकांची निवड करण्यात आली असून संबंधित स्पर्धकांना कळविण्यात आले आहे. त्यापैकी अंतिम फेरीसाठी निवडल्या जाणाऱ्या तीन एकांकिकांसाठी भारतातील ज्येष्ठ नाट्यकर्मींचे मार्गदर्शन लाभणार आहे. निकाल प्राप्त होताच पुढील माहिती जाहीर करण्यात येईल.

सर्व स्पर्धकांचे मनःपूर्वक आभार 🙏

**युवा उपक्रम**

बीएमएम २०२६अंतर्गत युवा उपक्रम (वयोगट १९ ते ३५) तरुणाईसाठी खास आकर्षण ठरणार आहे. आधुनिकता आणि मराठी मुळांचा सुंदर संगम साधणाऱ्या या उपक्रमात पुढील कार्यक्रमांचा समावेश असेल:

- **कॅन्डललाइट कॉन्सर्ट**
- **नृत्य कार्यशाळा**
- **स्पीड डेटिंग**
- **विविध सामाजिक उपक्रम**

जुन्या मित्रांना भेटा, नवीन मित्र जोडा आणि मराठी समुदायाचे भविष्य घडवण्यात आपला सहभाग नोंदवा!
नोंदणीसाठी फॉर्म भरा:
https://forms.gle/3kooEz4Vsxu91r9z5

**उत्तररंग उपक्रम**

६ ऑगस्ट (Day 0) रोजी होणारा 'उत्तररंग' कार्यक्रम ज्येष्ठांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.

सुप्रसिद्ध वक्ते **डॉ. संजय उपाध्ये** आणि **डॉ. आनंद नाडकर्णी** यांची प्रेरणादायी व्याख्याने, अंताक्षरीसारखे मनोरंजक उपक्रम, तसेच सिॲटलमधील स्थानिक न्यूरोलॉजिस्ट यांचे मार्गदर्शन अशा ज्ञानवर्धक आणि आनंददायी कार्यक्रमांचा उत्तररंग मध्ये समावेश आहे. नोंदणीसाठी:

https://bmmseattle2026.org/bmm2026

**Real Estate Conference Update**

रिअल इस्टेट परिषद आता ऑगस्ट ७ रोजी मुख्य अधिवेशनाचा भाग म्हणून सर्वांसाठी खुली असेल.

पुणे, मुंबई आणि महाराष्ट्रातील नामांकित बांधकाम व्यावसायिक तसेच अमेरिकेतील अग्रगण्य तज्ज्ञ सध्याच्या बाजारपेठ व गुंतवणूक संधींवर मार्गदर्शन करतील.

**Business Conference – ठळक घोषणा**

बिझनेस कॉन्फरन्ससाठी मुख्य अतिथी म्हणून **डॉ. आनंद देशपांडे** (Founder, Chairman & MD – Persistent Systems) यांची उपस्थिती निश्चित झाली आहे. ही परिषद पुढील वैशिष्ट्यांसह समृद्ध असेल:

- मुख्य भाषण Keynote speech
- प्रभावी लघु व्याख्याने
- तज्ज्ञांची चर्चासत्रे – Panel Discussions

ह्यात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), सायबरसुरक्षा, स्वयंचलित व भविष्यकालीन प्रवास तंत्रज्ञान, तसेच IT आणि Non-IT क्षेत्रातील विविध विषयांचा समावेश असेल. उद्योगजगत, व्यावसायिक आणि उद्योजक यांच्यात संवाद, नवकल्पना आणि सहकार्य वाढवण्यासाठी ही परिषद एक प्रभावी व्यासपीठ ठरेल.

थोडक्यात काय? हे फक्त एक अधिवेशन नाही, हा आहे एक मराठमोळा भव्य सोहळा; मजा, धमाल, हशा आणि जल्लोष हे

सगळं एकाच ठिकाणी! तर मग कसली वाट बघताय? मित्र, परिवार, भेटी-गाठी, जोडीला दर्जेदार कार्यक्रम, अशा उत्तम मिलाफाची योजना तयार आहे...आता फक्त तुमचा सहभाग बाकी आहे!😉 आपली आणि आपल्या परिवाराची नोंदणी आजच निश्चित करा आणि या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार व्हा.
https://bmmseattle2026.org/register?referrer=bmmvruttaapril
कारण हे स्नेहसंमेलन चुकवणं म्हणजे FOMO निश्चित!

**बीएमएम २०२६ च्या स्मरणिकेसाठी आम्ही जाहिराती स्विकारत आहोत.**

तुम्हाला तुमच्या व्यवसायाची, कामाची अथवा तुमच्या संस्थेची जाहिरात करायची असल्यास ही सुवर्णसंधी आहे कृपया अधिक माहितीसाठी इथे संपर्क साधा:

smaranika@bmmseattle2026.org

### 🙏 Be a Donor – Support Us

तुमच्या योगदानातून हे स्नेहसंमेलन अधिक भव्य, समृद्ध आणि अविस्मरणीय ठरेल. मराठी संस्कृतीच्या या उत्सवात आपला मोलाचा वाटा नक्की उचला. संपर्क :
donations@bmmseattle2026.org

आपल्या सततच्या पाठिंबा, विश्वास आणि सहभागाबद्दल आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार 🙏
भेटूया सिॲटलमध्ये... #Seaya तोवर आमच्या समाज माध्यमांवर भेटत राहू 👇🏼
**संकेतस्थळ:** bmmseattle2026.org
**यूट्यूब:** www.youtube.com/@BMM2026SEATTLE
**फेसबुक पेज:** www.facebook.com/bmm2026seattle
**फेसबुक ग्रुप:** www.facebook.com/groups/bmm2026seattle
**इंस्टाग्राम:** www.instagram.com/bmm2026seattle
**इमेल-पत्ता:** स्नेहसंमेलनासंबंधीच्या सूचना, अभिप्राय आणि प्रश्नांसाठी - info@bmmseattle2026.org

आपला विश्वास, आपली साथ — हाच आमचा प्रेरणा स्रोत आहे.
**चला, जपूया संस्कृती, विणूया नाती !!!**🙏🌸
- **अश्विनी क्षीरसागर**, बीएमएम २०२६ समिती

## चौथे विश्व मराठी संमेलन – नाशिक

फेब्रुवारीच्या सुरुवातीला आमचे बीएमएम अध्यक्ष श्री. प्रसाद पानवळकर यांच्याकडून नाशिक येथे होणाऱ्या चौथ्या विश्व मराठी संमेलनाची पहिली सूचना मिळाली. श्री. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे २०२६ च्या पहिल्या तिमाहीत संमेलन होणार की नाही, याबाबत काहीशी अनिश्चितता निर्माण झाली होती. अध्यक्ष पानवळकर यांनी कामानिमित्त संमेलनास उपस्थित राहता येणार नसल्याचे सांगून बीएमएमच्या वतीने प्रतिनिधित्व करण्यासाठी स्वयंसेवकाची विनंती केली. मागील दोन संमेलनांना उपस्थित राहिल्यामुळे मी बीएमएमचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पुढे आलो.

**तयारी आणि सहभाग:** सर्व मंडळ अध्यक्ष आणि बीएमएम प्रतिनिधींशी तातडीने समन्वय साधून त्यांच्या समुदायांमध्ये संमेलनाची माहिती पोहोचवण्याचे काम सुरू केले. एका आठवड्यात २५ हून अधिक सहभागी निश्चित झाले—यामध्ये चार बीएमएम समिती सदस्य, माजी अध्यक्ष, शाळा आणि वृत्त उपक्रमांचे स्वयंसेवक तसेच इतर सदस्यांचा समावेश होता.

**नाशिकमध्ये आगमन:** नाशिकमध्ये पोहोचताच शहरभर लावलेले "विश्व संमेलन"चे भव्य फलक लक्ष वेधून घेत होते. संमेलनाची सुरुवात मराठी भाषा गौरव दिन, जो कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी साजरा केला जातो त्या दिवशी; नाशिक येथील त्यांच्या निवासस्थानापासून रंगतदार शोभायात्रेने झाली. २,००० हून अधिक सहभागी—शालेय विद्यार्थी, लेझीम पथके, ढोल-ताशा वादक आणि सुंदर मूर्ती घेऊन चालणारे कलाकार—यांनी शोभायात्रेला अप्रतिम रंगत आणली. संपूर्ण मिरवणुकीत शिस्त आणि स्वच्छतेचे उत्तम पालन दिसून आले.

**स्थळ आणि व्यवस्था:** एमव्हीपी समाजाच्या केटीएचएम कॉलेजमधील संमेलनस्थळ प्रशस्त, आकर्षक आणि पूर्वीच्या पुणे व मुंबई संमेलनांपेक्षा अधिक सुबक होते. महाविद्यालयातील तरुण स्वयंसेवकांनी नोंदणी, कार्यक्रम विभाग आणि खाद्यव्यवस्थेचे उत्कृष्ट नियोजन केले. तीनही दिवस नाश्ता, दुपारचे आणि रात्रीचे जेवण उत्तम होते. अनेक खाद्यकेंद्रांमुळे प्रतीक्षा वेळ अत्यल्प होता.

**उद्घाटन आणि कार्यक्रम:** मराठी भाषा विभाग आयोजित तीन दिवसीय महोत्सवाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. हा दिवस ज्ञानपीठ पुरस्कार विजेते, प्रख्यात कवी कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांच्या जयंतीचा होता. उपमुख्यमंत्री

सुनेत्रा पवार, मंत्री छगन भुजबळ आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत हेही उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांचे भाषण विशेष प्रभावी होते. मराठी संस्कृती, जागतिक मराठी समुदाय, एआय तंत्रज्ञान आणि महाराष्ट्राशी असलेले नाते या सर्व विषयांना त्यांनी स्पर्श केला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही अत्यंत स्पष्ट आणि मनापासून संवाद साधला.

शिकायला गेलो एक, फोक आख्यान आणि नंदेश उमप यांचे लोकनाट्य अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा मनसोक्त आनंद घेतला.

**जागतिक सहभाग आणि बीएमएम सादरीकरण :** महाराष्ट्र सरकारने अमेरिका, कॅनडा, युरोप, यूएई, स्विट्झर्लंड, केनिया आणि इतर देशांतील मराठी समुदायांना आमंत्रित केले होते. १०० हून अधिक आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी उपस्थित होते.




**बीएमएमला ३० मिनिटांचा सादरीकरणाचा वेळ देण्यात आला.**

**श्री. संतोष साळवी (खजिनदार)** — बीएमएमचे ध्येय आणि उद्दिष्टे

**श्री. नरेंद्र कल्याणकर (सचिव)** — उत्तर अमेरिकेतील कार्यक्रम

**श्री. पुरुषोत्तम ठाकरे (कार्यकारी सदस्य)** — भारतातील कार्यक्रम

**श्री. आनंद चोथाई (कार्यकारी सदस्य)** — बीकनेक्ट उपक्रम

**सौ. मायुरी नाईक** — मराठी शाळा उपक्रम

**सौ. शुभदा सावरगावकर** — वृत्त उपक्रम

**श्री. केतन काळे** — मराठी चित्रपट उपक्रम

**एकूण अनुभव आणि सूचना:** तीन दिवसांचे संमेलन अत्यंत समृद्ध, प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरले. भविष्यातील संमेलनांसाठी माझी सूचना अशी की आयोजकांनी नियोजनाच्या सुरुवातीच्या टप्प्यातच बीएमएम नेतृत्वाशी संवाद साधावा आणि सांस्कृतिक व भाषिक योगदानाबरोबरच आर्थिक, शैक्षणिक आणि गुंतवणूकविषयक सहकार्याच्या संधींचाही विचार करावा.

\- **श्री. संतोष साळवी,** बीएमएम खजिनदार

**Amended and Restated By- Laws for Bruhan Maharashtra Mandal of North America, Inc. (BMM) can be found at:**
**https://bmmonline.org/wp-content/uploads/2026/03/BMM-Amended-and-Restated-By-Laws-v2.0-Feb-2026.pdf**

## नवचैतन्याचे अंकुर

'बीज अंकुरले रोप वाढले' ह्या संत तुकारामाच्या काव्यपंक्ती, मातीच्या कुशीत दडलेले स्वप्न कसे हळूहळू डोळस होते त्याची प्रचिती देते. रूजलेले बीज जेव्हा पहिल्या अंकुरात रूपांतरीत होते तेव्हा केवळ रोपच उगवत नाही तर नव्या आशेला, नव्या चैतन्याला सुरुवात होते. प्रत्येक अंकुर हा जीवनाच्या जिद्दीचा, सातत्याचा आणि विश्वासाचा पुरावाच जणु.

जशी निसर्गात नव्या जीवनाची चाहूल लागते तसेच भारतीय पंचांगानुसार नव्या वर्षाची सुरुवात चैत्र महिन्यापासून होते. चैत्र केवळ पहिला मराठी महिना नाही तर नव्या सुरुवातीचे, नव्या संकल्पाचे प्रतीक आहे. जुन्या पानगळीनंतर जेव्हा निसर्ग पुन्हा एकदा हिरवा श्वास घेतो तेव्हा निसर्गदेवतेने जणू हिरवळीची फुंकर घालून सगळीकडे ताजेपणा, उत्साह पसरवल्यासारखा वाटतो आणि माणसालाही नव्या आरंभाची ऊर्जा देतो. याच काळात सृष्टी बहरते, नवीन पिके तयार होतात. यामध्ये चैतन्याबरोबर नवनिर्मितीची भावना असते.

तसेच वसंत ऋतुच्या आगमनाने झाडांना नवी पालवी फुटते. फुलांमध्ये रंगांची उधळण होते. वातावरणात प्रसन्नता दरवळते. जणू काही निसर्ग सांगत असतो की प्रत्येक शेवटानंतर नवी सुरुवात निश्चितच आहे. याच वेळी गुढीपाडव्याच्या निमित्ताने उभारलेली गुढी नव्या संकल्पांची, सकारात्मकतेची ठरते. ही गुढी म्हणजे नुसता सण नसून मानवी भावनांचे, विजयाचे प्रतिक आहे. याच बरोबर येणारी अक्षय तृतीया, साडेतीन मुहूर्तांपैकी एक. जी परत एक नवीन सुरवात, समृद्धी आणि चिरंतन यशाचे प्रतीक मानले जाते.

वसंत ऋतू म्हणजेच Spring Season त्याचे रसदार वर्णन Antonio Vivaldi 1(4March 1678 – 28 July 1741 was an Italian composer, virtuoso violinist and impresario of Baroque music.) याच्या The Four Season 1(His best-known work is a series of violin concertos known as The Four Seasons) मध्ये केले आहे. भावनिक तरलता, निसर्गसृष्टी सौंदर्याचे टिपलेले अचूक वर्णन याचा सुंदर मिलाप आणि सादरीकरण दिसून येते.

याचबरोबर आनंद, उत्साह संगीतातून प्रभावीपणे व्यक्त केले आहे. या रचनेत तीन मूव्हमेंट्स असून पहिल्या Allegro मध्ये पक्ष्यांची किलबिल, पाण्याचा खळखळाट व वसंतातील वादळाचे चित्र उभे राहते. दुसरी Largo मूव्हमेंट शांत वातावरण दर्शवते, तर तिसरी Allegro पुन्हा उत्साह व आनंद व्यक्त करते. १७२५ साली प्रकाशित

झालेली ही रचना Baroque संगीतकाळाच्या सौंदर्याचा प्रभावी नमुना आहे.

वसंत ऋतूमुळे कलाकारांना नेहमीच कला आणि संगीत क्षेत्रात प्रेरणा मिळत आली आहे. विन्सेंट व्हॅन गॉग या चित्रकाराने Almond Blossom[1] (१८९०) या चित्रामध्ये बहरलेली बदामाची झाडे दाखवून नवी सुरुवात आणि आशेचे प्रतीक मांडले आहे. हे चित्र त्याने फ्रान्समधील आर्ल्स आणि सेंट-रेमी येथे काढलेल्या वसंत ऋतूवरील चित्र मालिकेचा भाग आहे. त्याचप्रमाणे क्लॉड मोने यांचे Springtime[1] (१८७२) आणि व्हॅन गॉगचे Green Wheat Fields, Auvers[1] (१८९०) ही चित्रे निसर्गाच्या नवचैतन्य प्रतिबिंबित करतात. European Middle age to Renaissance Period या काळात विशेषतः इम्प्रेशनिस्ट कलाकारांनी डवरलेली झाडे, हिरवीगार शेते आणि सतेज निसर्ग याद्वारे वसंत ऋतूचे सौंदर्य चित्रांमधून व्यक्त केले आहे. भारतीय संगीतातही वसंत ऋतू हा निसर्ग, प्रेम आणि उत्साहाशी जोडलेला आहे. बसंत, बहार, हिंडोल, वसंत बहार आणि सोहनी यांसारख्या रागांमधून फुलणारे जीवन, प्रेमभावना आणि होळीचा आनंद व्यक्त केला जातो. अशा प्रकारे वसंत ऋतू कला व संगीतात नवजीवन, आनंद आणि सौंदर्याचे प्रतीक म्हणून प्रतिबिंबित होतो.

हे सगळे पाहिल्यावर परत म्हणावेसे वाटते बीज अंकुरले, रोप वाढले.

मातीच्या काळोखात विसावलेले बीज, स्वतःच्याच अस्तित्वाला प्रश्न विचारत, अनोळखी दिशेकडे प्रवास सुरू करते. भूमीतूनच जन्म घेऊन, भूमीला भेदत ते वर येते. प्रकाशाच्या पहिल्या स्पर्शासाठी आसुसलेले.

जसे वसंताच्या श्वासात स्वर जागे होतात, शास्त्रीय संगीतात नवे आलाप फुलतात,

कॅनव्हासवर रंग बोलू लागतात, तसेच जीवनाच्या प्रत्येक कलेत नवचैतन्य स्वतःचं रूप शोधत राहते.

अज्ञाताच्या कुशीत उडी घेतलेलं ते बीज, रोप होऊन, वृक्षात रुपांतरीत होते आणि पुन्हा बीज बनते. काळाच्या या अखंड प्रवाहात एकच सत्य शांतपणे उमलत राहतं ‘बीज अंकुरले, रोप वाढले’. तेव्हा वाटते की जणू अंकुरलेले बीज म्हणत आहे की,

डोळे दिपले प्रकाशाने
मन भरले हिरवळीने
किलबिल पक्ष्यांची
सळसळ पानांची
फुलांचा बहर
रंगांचा कहर
भाईबंद माझे
शेजारी झाले
इकडे तिकडे
पाहत राहिले
सगळ्यांना घेऊन
वाढायचे आहे
सगळ्यांना घेऊन
डवरायचे आहे !

*Reference: [1] Net Search*

- **उत्तरा भालेराव,** टॅम्पा, फ्लोरिडा

**राशिभविष्य : एप्रिल २०२६**

**“ पूर्वार्ध शांत जाईल. गुरु मार्गी लागून मिथुनेत वाटचाल करत असेल."**

**अजय तनखीवाले**
https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## कविता स्पर्धा : निकाल



बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वृत्तातर्फे आयोजित काव्यस्पर्धेला उत्तम प्रतिसाद मिळाला. अनेक कवी आणि कवियत्रींनी कविता पाठवल्या त्यांचे मनापासून आभार. कवितांसाठी स्पर्धेचा विषय होता **‘प्रेम’**. यामध्ये केवळ रोमँटिक नाही तर वात्सल्य, निसर्गप्रेम किंवा ईश्वरावरील प्रेम अशा प्रेमाच्या अनेक रंगांमधल्या कोणत्याही विषयावरच्या कवितांसाठी स्पर्धा खुली होती. प्रेमाच्या या सगळ्या रूपांवरच्या कविता स्पर्धेसाठी आल्या. स्पर्धेसाठी **नितीन जोशी, शैलेश पोतदार** आणि **विदुला कोल्हटकर** यांनी परीक्षक म्हणून काम केले. कविता निवडीसाठी आशय, अर्थ, शब्द, आणि गेयता हे चार निकष होते. आलेल्या कवितांमधून विजेत्या कविता निवडणे खरोखरच फार अवघड होते. पाचव्या क्रमांकासाठी दोन कवितांना अगदी सारखेच गुण मिळाल्याने त्या दोनही कवितांची निवड करण्यात आली. परीक्षकांना आवडलेल्या या कविता वृत्ताच्या वाचकांनाही नक्कीच आवडतील.

## #१ आविष्कार

त्यागीन आनंदे। भारे रेशमाचे
तुझिया स्पशार्चे । सुख मिळो ॥

त्यागीन आनंदे । नक्षत्रे नभीची
तुझ्या नयनीची । ज्योत मिळो ॥

त्यागीन आनंदे । पुष्पांचा सुवास
तुझा एक श्वास । मज मिळो ॥

त्यागीन आनंदे । छाया पिंपळाची
तुझिया बटांची । शेज मिळो ॥

त्यागीन आनंदे । शत सूयोर्दय
तुझे तेजोमय । स्मित मिळो ॥

त्यागीन आनंदे । नाद घुंगरांचा
तुझिया हास्याचा । साज मिळो ॥

त्यागीन आनंदे । उत्प्रेक्षा उपमा
जर तुझ्या प्रेमा । झालो पात्र ॥

त्यागीन आनंदे । आयुष्याचा भार
दावी आविष्कार । सखे मज ॥

- **सत्येंद्र होम्बळी**, पॉईंसीना, फ्लोरिडा

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



## #२ हरि स्नेह

माझ्या घराच्या अंगणी,
सुंदर तुळस देखणी ।
त्यात निवासस्थानी,
माझे विठ्ठल - रुक्मिणी।

तुझ्या मायेचा ठेवा,
किती गोड आहे देवा ।
लाड पुरविती माझे,
जणू लेकरू मी त्याचे ।।

चुका पदराखाली घेई,
माझी लाडकी रखुमाई ।
तुझ्या प्रेमाची ही साद,
देई आधाराची दाद ।।

सदैव माझ्या मस्तकावरी,
तुझ्या प्रेमाची चादर साजिरी ।
म्हणूनच सांगते देवा,
मी तुझी वारकरी, तूच माझी पंढरी ।।
राम कृष्ण हरी । राम कृष्ण हरी ।।

**- मनीषा माळवदकर,** फिनिक्स, आरिझोना

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



## #३ मातृप्रेम (तरु-धराचे)

[वृत्त वसंततिलका]

मेरु समान रुजला, तरु अंगणात
भूमी तयात वसली, ग कणा कणात
त्याच्या नसात भिनले, धरतीच गूढ
अस्तित्व त्याच तिचिया, उदरात रूढ

फांदी वरी उमटला, तिजसाठि ध्यास
त्याने तिचा भरियला, पदरात वास
तो प्रेम ओतुन करी, जननीचि भक्ती
पाना फुलांनि सजवी, दिन रात्र तीसी

आईचि नाळ अजुनी, जुळली तयाशी
लाखो मुळांनि धरिले, तिज काळजाशी
पूजा करी निशि दिनी, हृदयात तीची
आई समान न दिसे, कुणिही तयासी

एका ऋषी परि उभा, ध्रुव बाळ जैसा
प्रेमाचि ह्याच तुलना, करि कोण कैसा
कर्तव्य भाव असले, कुणि पाहिले का?
सांगा तुम्ही नमन हे, अस पाहिले का?

- **शशांक चिटणीस,** बफेलो , न्यू यॉर्क

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



## #४ जेव्हा आपल्या आयुष्यात प्रेम येतं..

चाकोरीतून चालताना, अचानक एक वळण येतं
ग्रीष्मातील आगंतुक पावसासारखं, आपल्या आयुष्यात प्रेम येतं..

दाटून आलेलं असतं आभाळ, जेव्हा मळभ साठलेलं असतं
मनाचा कानोसा घेण्यापूर्वीच, प्रेमाचं अंबर फाटलेलं असतं...

कैकदा शोधून जे सापडत नाही, मागूनही कुणा मिळत नाही
असे प्रेम आताच आपल्या वाट्याला का आलं? हे योगायोगाच्या तर्कापलीकडे कळत नाही...

व्यक्त व्हावे की अव्यक्त रहावे? डोहात या डुंबावे, की काठावरून अलिप्तपणे पहावे?
संभ्रमित मन अन् सतर्क मेंदू यांची तुंबळ जुंपलेली असते,
ऋणानुबंधाची वीण दैवाने,
आपल्याही नकळत गुंफलेली असते...

घेतल्या जातात हळव्या शपथा, व्यक्त होतो समर्पणाचा इरादा,
प्रेम यशस्वी होणार का? याला आता महत्त्व नसतं, सचोटीने साथ देताना, तारण ठेवलेलं स्वत्व असतं...

जरी येता असंख्य अडथळे, ते पार करणं हेच एकमेव ध्येय असतं
मागे फिरणं शक्य असतानाही तसे न करणं
इतकंच दोघांना प्रेय असतं...

उत्कट अशा भावनांचा हिंदोळा, उत्तुंग स्तरावर घेऊन जातो
प्रेमाचा हा अतुल्य जागर, अर्धत्वाने शापित जीवांना पूर्णत्व देतो...

सहजीवनाचं समीकरण सोडविताना, एकमेकांच्या प्रश्नांचा मागोवा घेता
अचानक उत्तर सेम येतं, जेव्हा आपल्या आयुष्यात प्रेम येतं...

प्रेमात पडणं आणि त्यातून पुढे पूर्णत्व येणं,
नक्षत्रांचं हे देणं, इतकंच या शब्दांमधून सांगणं...

- **स्वप्ना कानविंदे,** नेपरव्हील, इलिनॉय

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## #५ प्रेमाचे अद्वैत

आठवू तुला कसे मी
विसरलो तुला न जेव्हा
हृदयी तुझ्या कसे मी
हृदयात माझ्या तू जेव्हा

पाहू तुला कसे मी
वेगळे न मी तू जेव्हा
दिसलो न दर्पणी मी
प्रतिबिंब तुझेचं जेव्हा


बोलतो तुला जणू मी
बोलतो स्वत:शी जेव्हा
करिता स्तूती तुझी मी
वाटे फुशारकी तेव्हा

माझी कसे म्हणू मी
माझा न मीचं जेव्हा
शोधू तुला कुठे मी
विरलीस माझात जेव्हा

संभ्रमीत का सदा मी
उलगडे तुला ते तेव्हा
अद्वैत हे प्रेमाचे
समजेल तुला ते जेव्हा

- **प्रवीण कारंजकर,** आल्बनी, न्यूयॉर्क

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



## #५ मी न माझी राहिले

वसलास अंतरी असा तू
भाव उजळू लागले
शब्द तुझे ऐकताना
मी न माझी राहिले ||१||

तू नि मी असावे सोबत
नित्य मनी प्रार्थते
स्वप्नी तुला पहिले अन
मी न माझी राहिले ||२||


नाद तूझा घुमतो अनाहत
स्वर तुझे गुंजती मनी
गीत तुझे कानी येता
मी न माझी राहिले ||३||

बोलतोस नजरेतूनी
स्पर्शूनी हळुवार जेव्हा
तू प्रत्यक्ष उभा राहता
मी न माझी राहिले ||४||

दोघेही हरवून गेलो
मी तुझ्यामध्ये तू माझ्यामध्ये
पाहुनी रे प्रीत आपुली
क्षणही स्तब्ध जाहले ||५||

- **रोहिणी कुंभार,** फिनिक्स, ॲरिझोना

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



## अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख



शुभम जोशी, कमिंग, जॉर्जियाच्या माध्यमिक शाळेतील एक हुशार, मेहनती विद्यार्थी. लहानपणापासूनच विज्ञान आणि विशेषतः भौतिकशास्त्राची आवड. नवीन गोष्टी समजून घेणं, प्रयोग करत शिकणं, अभ्यासाबरोबरच स्वतःचे स्वतः क्लॅरिनेट वाजवायला शिकणे, हे त्याचे छंद. त्याच्या या कलांमुळेच त्याला शाळेचं प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळते आणि ती कामगिरी चोखपणे बजावत शाळेला दुसरा क्रमांकही. खरोखर कौतुकास्पद आणि अद्वितीय. अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणाऱ्या अशा या शुभमशी मारलेल्या या गप्पा.

**शुभम, स्वतःची ओळख करून देशील का? तू सध्या कोणत्या वर्गात शिकतोस आणि तुला कोणत्या गोष्टी करायला सर्वात जास्त आवडतात?**

मी शुभम जोशी, जॉर्जियातील कमिंग येथील साउथ फोर्साइथ हायस्कूलमध्ये ११वीत शिकतो. मला वाचन खूप आवडतं. त्याशिवाय 'outdoor sports' आणि लोकांशी बोलायला आवडतं. विज्ञान - विशेषतः भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र माझे आवडीचे विषय आहेत आणि त्याच बरोबर मला क्लॅरिनेट हे वाद्य वाजवायला खूप आवडतं.

**तुला विज्ञानाची, विशेषतः भौतिकशास्त्राची, आवड कशी लागली? असा काही क्षण होता का जेव्हा तुला विज्ञान खूप मजेशीर वाटायला लागलं?**

माझ्या शेजारी राहणाऱ्या, वयाने माझ्याहून मोठ्या असलेल्या मित्रमंडळींची विज्ञानातली आवड बघून मलाही त्याची गोडी लागली. त्याचबरोबर मी 'नेटफ्लिक्स'वर डॉक्युमेंटरी पाहायचो. उदाहरणार्थ 'Our Planet' किंवा भौतिकशास्त्रासाठी 'Cosmos', ज्यामुळे मला भौतिकशास्त्र आणि खगोलशास्त्राची ओळख झाली. त्यानंतर डॉक्युमेंटरीज पाहून स्वतः संशोधन करणं आणि जर समजलं नाही ते 'गुगल' करणं किंवा 'यूट्यूब' वर व्हिडिओ पाहणं - असा छंदच लागला. कारण भौतिकशास्त्रात तुम्ही एखादी गोष्ट जरी बदलली तर त्याचा परिणाम लगेच समजू शकतो याचे आकर्षण वाटू लागले. मला 'Sudoku' कोडी सोडवायला तसेच विज्ञानातील समस्या - 'प्रॉब्लेम सॉलव्हिंग ' खूप आवडतं.

**कधी एखादा विषय कठीण वाटला तर तू तो समजून घेण्यासाठी काय करतोस ?**

प्रथम मी माझ्या शिक्षकांकडे जातो. माझे भौतिकशास्त्राचे शिक्षक खूप मदत करणारे आहेत. ते कोणताही साधा किंवा कठीण प्रश्न नेहमी समजावून सांगतात आणि जर शिक्षक उपलब्ध नसतील, तर मी 'यूट्यूब'वर किंवा इतर माहितीच्या स्रोतांचा आधार घेतो. त्यानंतर तो विषय समजून घेण्यासाठी मी त्या संबंधीचे काही प्रश्न सोडवतो आणि विषयाचे पूर्ण आकलन होईस्तोवर सतत सराव करत राहतो.

मागच्या 'सेमिस्टर'मध्ये मी थोडा मागे पडत होतो कारण मला गणित आणि भौतिकशास्त्र दोन्ही एकत्र शिकावं लागत होतं. मी खूप चिंतेत होतो. पण माझे शिक्षक श्री बटलर यांनी मला शाळेनंतर बसवून सगळं शांतपणे समजावून सांगितल्यावर मात्र मला ते अगदी नीट समजले.

**सायन्स ऑलिम्पियाडसारख्या स्पर्धांसाठी तयारी करताना तुझा अनुभव कसा होता? त्यात तुला काय सर्वात जास्त काय आवडलं?**

सायन्स ऑलिम्पियाडमध्ये 'टेस्टिंग' आणि 'इंजिनियरिंग' असे दोन प्रकारचे कार्यक्रम - 'इव्हेंट्स' असतात. मला 'इंजिनियरिंग इव्हेंट्स' जास्त आवडतात. हे सगळे टिमवर्क आहे. त्यामुळे आम्ही टीममध्ये काम करतो. आम्ही आठवड्यातून एकदा शाळेनंतर काही तास भेटायचो आणि त्या प्रकल्पावर काम करायचो. तेव्हा 'इंजिनियरिंग डिझाइन' म्हणजे 'connecting wires, building the base or adjusting the power of fans', अशी कामे केली . थोडक्यात , तीन दिवसांत "hovercraft" बनवून आम्ही चौथा क्रमांक मिळवला.

**अभ्यासाव्यतिरिक्त तुला मोकळ्या वेळेत काय करायला आवडतं?**

मी खूप वाचन करतो. दिवसातून २०-३० मिनिटं तरी वाचन करतोच. मुख्यत: Harry Potter किंवा Hunger Games सारखे फॅन्टसी आणि 'सायन्स फिक्शन' वाचायला मला खूप आवडतं.

**अभ्यास, स्पर्धा आणि बँड प्रॅक्टिस, हे सगळं तू कसं सांभाळतोस?**

‘टाइम मॅनेजमेंट’ महत्वाचे आहे. अभ्यासानंतर नेहमीच मी थोडा वेळ स्वतःसाठी ठेवतो. तो माझा तणाव कमी करण्याचा आणि आराम करण्याचा वेळ असतो. ज्यामुळे मला माझ्या वेळेचे नियोजन अधिक चांगल्या प्रकारे करता येते.

**तू कोणते वाद्य वाजवतोस? तुला संगीत का आवडतं?**

मी लहान होतो तेव्हा माझ्या शेजारी राहणाऱ्या, वयाने माझ्याहून मोठ्या असलेल्या मित्रांकडून मला प्रेरणा मिळाली. ते नेहमी सांगायचे की वाजवून बघ, खूप मजा येते. तेव्हापासून मी क्लॅरिनेट निवडलं आणि सहा वर्षांपासून वाजवत आहे. ६वी ते ७वी मध्ये मी खूप मेहनत घेतली. इतर जण क्लासेस घेत होते, पण मी मात्र घरीच स्वतःचा स्वतः सराव करायचो आणि शेवटी बँडमध्ये तरबेज झालो.

**तुला वाटतं का की संगीत आणि विज्ञान यांच्यात काही मजेशीर संबंध आहे?**

मला वाटतं विज्ञान आणि संगीत दोन्ही समान महत्त्वाचे आहेत. विज्ञान माझं ‘करिअर’ आहे, पण संगीत मला स्वतःला व्यक्त करायला मदत करतं. संगीत संयम, शिस्त आणि मेहनत शिकवतं. मला शास्त्रीय संगीत (Western Classical) ऐकायला खूप आवडतं. ते मला शांत ठेवतं. विज्ञान आणि संगीत हे ध्वनी लहरींप्रमाणे एकमेकांशी जोडलेले आहेत, पण मी ते दोन्ही वेगळे ठेवतो.

**तुझ्या आतापर्यंतच्या यशापैकी तुला सर्वाधिक अभिमान कशाचा वाटतो?**

आणि पुढे करिअरच्या दृष्टीने—तुला कोणते क्षेत्र अधिक आशादायक वाटते? विशेषतः, अभ्यासाव्यतिरिक्त उपक्रमांमध्ये (जसे संगीत किंवा बँड प्रॅक्टिस) करिअर करण्याबद्दल तुझे काय मत आहे?

इयत्ता ८वीत असताना माझी All-State बँडमध्ये निवड झाली. हा माझ्यासाठी एक अभिमानास्पद क्षण होता. मी कोणतेही बाहेरचे क्लासेस घेतले नव्हते, तरीही मी निवडला गेलो. ‘Disney World’ मध्ये आम्ही परफॉर्म केलं आणि सर्वोच्च रेटिंग मिळवलं. खूप मजा आली. मला फिजिक्समध्ये ‘अंडरग्रॅज्युएट’ करून नंतर ‘पीएचडी’ करायचे आहे. मी संगीत केवळ एक छंद म्हणूनच सुरू ठेवीन, कारण ते क्षेत्र खूप स्पर्धात्मक आहे आणि करिअर म्हणून ते टिकवून ठेवणे खूप आव्हानात्मक आहे.

**तुझी ओळख फक्त अभ्यासापुरती मर्यादित न ठेवता—कला, क्रीडा, किंवा इतर उपक्रमांमध्ये करिअर घडवण्याबद्दल तू कसा विचार करतोस?**

बरेच लोक अभ्यासावर लक्ष केंद्रित करतात. संगीताच्या क्षेत्रात करिअर करणारे थोडे असतात. पण मी म्हणेन की, जर तुम्हाला संधी मिळाली, तर ती नक्कीच घ्या. ते तुम्हाला भविष्यात नक्कीच मदत करू शकते.

- **शब्दांकन: उत्तरा भालेराव,** टँपा, फ्लोरिडा

## BMM मराठी शाळा- समूहगान स्पर्धा निकाल

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या शाळा विभागाने आंतरशालेय समूहगान स्पर्धा आयोजित केली होती. त्यात जगभरातून त्रेचाळीस शाळांनी भाग घेतला. या स्पर्धेचा निकाल ३ मार्च २०२६ रोजी घोषित करण्यात आला. श्री. गणेश बडवे आणि श्री. नितीन वैद्य यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. अंतिम निवडीसाठी सुर-ताल, विषय तसेच सादरीकरणातील भावना आणि ऊर्जा असे निकष लावले गेले. सर्व विजेत्यांचे, त्यांच्या शिक्षकांचे आणि भाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकांचे मन:पूर्वक अभिनंदन.



HTTPS://YOUTU.BE/SZKY83OKG7I

पहिला क्रमांक - मोठा गट
एचएमएम मराठी शाळा

HMM Marathi Shala
#1 - BIG KIDS




जयोस्तुते
Jayostute



HTTPS://YOUTU.BE/HVPXV8BR2JU

दुसरा क्रमांक - मोठा गट
सीटीएमएम मराठी शाळा

ctmm marathi shala
#2 - BIG KIDS




वेडात मराठे वीर
vedat marathe veer



HTTPS://YOUTU.BE/V7TRPHVMEBS?SI=HRNQTNS9NDBLJLTF

तिसरा क्रमांक - मोठा गट
पिटसबर्ग मराठी शाळा

Pittsburgh Marathi Shala
#3 - BIG KIDS



हे शिवसुंदर
Hey Shivasundar



HTTPS://YOUTU.BE/R9RIGYH0-KI?SI=IBZIPOHSWN_XTUF3

उत्तेजनार्थ - मोठा गट
सीटीएमएम मराठी शाळा

CTMM Marathi Shala
Farmington Valley
Consolation - BIG KIDS



Hee maybhoomi
हे मायभूमी



HTTPS://YOUTU.BE/BKM4JJDYR2U?SI=7N60VZR0YVOWLAVK

पहिला क्रमांक
हाँगकाँग मराठी शाळा
Hong Kong Marathi Shaala
#1- Small Group



हे राष्ट्र देवतांचे
He rashtra dewatanche



HTTPS://YOUTU.BE/GDOYYFVWYMG

उत्तेजनार्थ - मोठा गट
कॅन्सस सिटी मराठी शाळा

Marathi shala Kansas City
COnsolation - BIG KIDS



हे राष्ट्र देवतांचे
He rashtra devatanche



HTTPS://YOUTU.BE/ZVSKWZJNVJY?SI=0X8ICW4HRLHVNS4T

दुसरा क्रमांक - छोटा गट
पिटसबर्ग मराठी शाळा

PITTSBURGH MARATHI SHALA
#2 - Small Group



चला चला शाळेमध्ये जाऊ
Chala Chala Shalemadhe Jaau



HTTPS://WWW.YOUTUBE.COM/WATCH?V=NSKSCV8_FU4

उत्तेजनार्थ - मोठा गट
संकल्प मराठी शाळा

Sankalp Marathi Shala
Consolation - BIG KIDS



वेडात मराठे वीर
Vedat Marathe veer



HTTPS://WWW.YOUTUBE.COM/WATCH?V=Z_KVRRC87U4

एचएमएम मराठी शाळा
तिसरा क्रमांक

HMM MARATHI SHALA
#3 - Small Group



मूषक मंडळी
gajanana sond tujhi



HTTPS://YOUTU.BE/RVVAEH0LNZC

उत्तेजनार्थ - मोठा गट
सिएटल मराठी शाळा

Seattle Marathi Shala
Consolation - Big Group



जयोस्तुते
Jayostute



LINK IS PROTECTED AGAIN

उत्तेजनार्थ - छोटा गट
कँटन मराठी शाळा

CANTON Marathi Shala
Consolation Small Group

डेट्रॉईटचे शिलेदार
हीच आमुची प्रार्थना
Heech Amuchi Prathana



https://youtu.be/-YiEWGDUHaQ?si=2UnbqOkIKIC9WOlO

उत्तेजनार्थ - छोटा गट
कोलंबस इंडियाना मराठी शाळा

COLUMBUS INDIANA
Marathi Shala
Consolation - Small group



स्वर्गात आकाशगंगा
Swargat Aakashganga



HTTPS://YOUTU.BE/HTXJCMMYKX4

उत्तेजनार्थ - छोटा गट
सिएटल मराठी शाळा

Consolation - Small Group
Seatle Marathi Shala



हीच आमुची प्रार्थना
Heech Amuchi Prathana



HTTPS://YOUTU.BE/LE4PUR8S4EO?SI-8FO3QDKOS-OFSSGM

उत्तेजनार्थ - छोटा गट
ऑस्टिन मराठी शाळा

Consolation - Small Group
Austin Marathi Shala



ओमकार प्रधान
Omkar Pradhan

## A letter from Mother Earth

Dear Children,

Why do you bite the hand that feeds you?
And shackle my hands when I need you?

The filth you put into the water I give you to drink,
You return liquid life with spoil and ink,

You choke my green lungs with smoke and grime yet I still give you the oxygen you need to scream,
You pour your poison into my air, my ground, and my streams,

But maybe it's my fault, did I love you too much to raise you right?

You pile your filth onto my sacred ground,
You raise my oceans just for you to drown,

You heat me up, boil my blood, but I keep quiet,
Your greed is more powerful than your will to do right,

I shed my precious tears to grow your crops,
You sting my eyes with acid raindrops,

But maybe it's me, maybe I did you wrong,

Why do you wage wars for my gifts and love, and you call it duty?
Why kill my other children and steal my eternal beauty?

You crowd and clutter my love and land,
You will see my resources washing away like my sand,

But as I lull you to sleep in my delicate arms,
You cut at my trees with greed, putting yourself in the way of harm,

But no, it's me. It might be my fault.

The gold on your neck was once close to my heart,
You rip it out of me and make it into vain, imposter art

I share with you all my blessings, you turn them into our shared curse
You steal all my savings as I go to get you money from my purse

I send my ozone soldiers to protect you from the sun's rage,
You release your emissions and build our very own shared cage

You then call me your mother and worship me,
I swallow your insults when you disrespect me

But I can only blame myself for this
I gave you too much, I spoiled you too much
Only because I cared for you.

Your loving mother,
The Earth

- **Sara Kulkarni**, Ellicott City, Maryland
*(12th grader at Centennial High School)*




## अलकनंदा: विश्वाच्या बाल्यावस्थेतील आकाशगंगेची जुळी

**विश्वाच्या बालपणीचे नवे रहस्य :** जेम्स वेब स्पेस टेलिस्कोपने (JWST) अवकाशात झेपावल्यापासून खगोलशास्त्रज्ञांच्या अनेक गृहीतकांना सुरुंग लावला आहे. या दुर्बिणीने सुरुवातीच्या विश्वाचे जे चित्र दाखवले, ते शास्त्रज्ञांच्या अपेक्षांपेक्षा खूप वेगळे आहे. आतापर्यंतचा समज असा होता की महास्फोटानंतरच्या पहिल्या एक-दोन अब्ज वर्षांत दीर्घिका अस्ताव्यस्त, विस्कळीत, अविकसीत असतात. त्यांना सुरचित व्हायला अब्जावधी वर्षे लागतात. पण JWST ने २०२२ पासून शोधून दिलेल्या शेकडो दीर्घिका या समजुतीला आव्हान देत आहेत. या समस्येला शास्त्रज्ञ "impossibly early galaxy problem" म्हणतात: विश्वाच्या अगदी बाल्यावस्थेत इतक्या प्रचंड, इतक्या परिपक्व दीर्घिका कशा निर्माण होऊ शकतात?

या वाढत्या पुराव्यांच्या साखळीतील एक अत्यंत महत्त्वाचा दुवा म्हणजे 'अलकनंदा', पुण्यातील NCRA-TIFR येथील संशोधक राशी जैन आणि योगेश वाडदेकर यांनी शोधलेली एक सर्पिलाकृती दीर्घिका. हिमालयातील अलकनंदा नदी ही गंगेची एक प्रमुख उपनदी आहे, आणि तिची जुळी उपनदी मंदाकिनी, जे आपल्या आकाशगंगेचे हिंदी नाव आहे. नव्याने सापडलेल्या या दीर्घिकेचे मंदाकिनीशी विलक्षण साधर्म्य आहे: स्पष्ट सर्पिलाकृती बाहू, तेजस्वी केंद्र भाग, सुव्यवस्थित डिस्क. म्हणूनच या दीर्घिकेला मंदाकिनीची 'जुळी' म्हणून **'अलकनंदा'** हे नाव दिले गेले.

**विश्वाच्या बालपणात एक सुरचित दीर्घिका:** अलकनंदाचा फोटोमेट्रिक रेडशिफ्ट, z, सुमारे ४ आहे. रेडशिफ्ट म्हणजे काय, हे एका उदाहरणाने पाहूया: हायड्रोजनचे एक महत्त्वाचे स्थित्यंतर आहे Lyman-alpha, लायमन मालिकेच्या वर्णपटाची पहिली रेखा. Lyman-alpha ची तरंगलांबी प्रयोगशाळेत १२१६ अँगस्ट्रॉम असते. अतिनील, डोळ्यांना अदृश्य. पण विश्वप्रसरणामुळे अलकनंदापासून येणाऱ्या प्रकाशाची तरंगलांबी इतकी ताणली गेली की तीच रेषा आता सुमारे ६,००० अँगस्ट्रॉमला, म्हणजे दृश्य स्पेक्ट्रममधील नारिंगी-लाल भागात दिसते. विश्वाच्या प्रसरणाने हा जो तरंगलांबीतला फरक होतो त्यावरूनच रेडशिफ्ट ठरते. $z \approx ४$ म्हणजे महास्फोटानंतर विश्व केवळ दीड अब्ज वर्षांचे असतांना. आपली आकाशगंगा सुमारे १३.६ अब्ज वर्षे जुनी आहे, आणि तिला सुस्पष्ट

सर्पिल बाहू विकसित व्हायला साधारण तीन ते चार अब्ज वर्षे लागली. अलकनंदाने मात्र हीच रचना अवघ्या काही शतकोटी (शेकडो दशलक्ष) वर्षांत मिळवली, हेच या शोधातून पुढे आलेले खरे आश्चर्य आहे.

अलकनंदाचा व्यास सुमारे ३२,५०० प्रकाशवर्षे (१० किलोपार्सेक) आहे. तिचे तारकीय वस्तुमान सुर्याच्या सुमारे दहा ते सोळा अब्ज पट आहे. आपल्या आकाशगंगेपेक्षा थोडे कमी असले तरी तिच्या वयासाठी विलक्षणच. तिला दोन स्पष्ट सममितीय सर्पिल बाहू आहेत. तिचा तारानिर्मितीचा वेग दरवर्षी सुमारे ५०–६० सूर्यांएवढा आहे, मंदाकिनीच्या तुलनेत सुमारे वीस ते तीस पट. शिवाय, तिच्या एकूण ताऱ्यांपैकी निम्मे अवघ्या वीस कोटी वर्षांत तयार झाले, म्हणजे ताऱ्यांची निर्मिती अत्यंत तीव्र गतीने सुरू आहे.

**JWST आणि गुरुत्वीय भिंगाची जुगलबंदी:** अलकनंदा थेट दिसत नाही. ती Abell 2744 या प्रचंड दीर्घिका-समूहाच्या मागे आहे. या समूहाचे गुरुत्वाकर्षण एखाद्या नैसर्गिक भिंगासारखे (gravitational lensing) काम करते ज्यामुळे अलकनंदाचा प्रकाश वक्र होतो आणि ती सुमारे दुप्पट तेजस्वी दिसते. यामुळेच JWST ला तिच्या सर्पिल रचनेचा तपशील टिपता आला.

जैन आणि वाडदेकर यांनी JWST च्या UNCOVER आणि MegaScience सर्वेक्षणांतील तब्बल एकवीस वेगवेगळ्या फिल्टर्समधून केलेल्या तिच्या निरीक्षणांचा वापर केला. या बहुतरंगलांबीच्या निरीक्षणांतून तिचे अंतर, धुळीचे प्रमाण, तारकीय वस्तुमान आणि तारानिर्मितीचा संपूर्ण इतिहास उलगडता आला. JWST च्या अतिनील प्रतिमांमध्ये सर्पिल बाहूंवर दोऱ्यावर ओवलेले मणी दिसावेत तसे नवीन तारे तयार होतांना दिसतात.

**JWST ची आव्हाने:** सद्य थिअरीज् ना आव्हान देण्यात अलकनंदा एकटी नाही. JWST ने अलीकडच्या काळात अशा अनेक 'अशक्य' दीर्घिका शोधल्या आहेत ज्या विश्वाच्या बालपणातच आश्चर्यकारकरीत्या परिपक्व आहेत. Rowland आणि सहकाऱ्यांनी $z \approx$ ७.३ वर एक अवघ्या ७० कोटी वर्षे वयाची पण स्थिरस्थावर झालेली डिस्क शोधली. de Graaff आणि सहकाऱ्यांना $z \approx$ ५.५–७.५ या दरम्यान अनेक स्थिर डिस्क असलेल्या दीर्घिका आढळल्या. Xiao आणि सहकाऱ्यांनी पहिल्या अब्ज वर्षांतच मंदाकिनीएवढे वस्तुमान असलेल्या अतिमहाकाय "रेड मॉन्स्टर्स" दीर्घिका शोधल्या.

या सर्व शोधांचा अर्थ असा की सुरुवातीचे विश्व आपण कल्पना केली होती त्यापेक्षा कितीतरी अधिक कार्यशील होते. पारंपरिक मॉडेल्सनुसार दीर्घिका तयार होणे ही संथ प्रक्रिया आहे: गॅस जमा होणे, फिरत्या डिस्कमध्ये स्थिरावणे, मग सर्पिल बाहू तयार होणे. या संपूर्ण प्रवासाला अब्जावधी वर्षे लागतात. पण अलकनंदा आणि तिच्या सारख्या दीर्घिकांमध्ये हे सारे काही शेकडो दशलक्ष वर्षांत घडलेले दिसते.

**संभाव्य स्पष्टीकरणे:** शास्त्रज्ञ काही शक्यता मांडतात. एक म्हणजे बाहेरून थंड गॅसचा सातत्यपूर्ण ओघ आल्यामुळे जलद डिस्क तयार झाली, ज्यात ताऱ्यांची बदलणारी दाटी (density waves) नैसर्गिकरीत्या सर्पिल बाहूंना जन्म देऊ शकल्या. दुसरी शक्यता म्हणजे लहान दीर्घिकांशी झालेल्या गुरुत्वीय टकरींमुळे हे सर्पिल बाहू निर्माण झाले. पण या प्रकारे तयार झालेले बाहू साधारणपणे अल्पायुषी असतात. तिसरी, आणि कदाचित सर्वांत महत्त्वाची, शक्यता अशी की सुरुवातीच्या विश्वातील भौतिक प्रक्रिया जसे की गॅस संचय, डिस्क स्थिरीकरण, density waves चा विकास, या सध्याच्या मॉडेल्सच्या अंदाजापेक्षा कितीतरी प्रभावी होत्या.

JWST च्या स्पेक्ट्रोस्कोपिक उपकरणांद्वारे आणि चिलीतील ALMA दुर्बिणीद्वारे अलकनंदाच्या फिरण्याचा वेग मोजला जाईल, तिची डिस्क स्थिरावली आहे की त्या भागात तारे अजूनही सैरावैरा पळतात हे कळेल, आणि तिचे सर्पिल बाहू density waves मुळे तयार झाले की गुरुत्वीय टक्करीमुळे हे स्पष्ट होईल. पण एकट्या अलकनंदावरून सिद्धांत बदलत नाहीत. त्यासाठी अशा दीर्घिकांचा मोठा नमुना लागतो. येत्या काही वर्षांत Vera C, Rubin Observatory चे LSST सर्वेक्षण अब्जावधी दीर्घिकांचे व्यापक छायाचित्रण करेल, तर Nancy Grace Roman Space Telescope JWST सारखीच अवरक्त (infrared) दृष्टी बाळगून त्याच्या दोनशे पट रुंद आकाशक्षेत्रात शोध घेईल. JWST ने जे खोलवर पाहिले, ते Roman आणि LSST आकाशाच्या मोठ्या भागात पाहतील, आणि अलकनंदासारख्या दीर्घिका अपवाद आहेत की नियम, हे कळेल.

**विश्वाबद्दलची आपली समजूत उत्क्रांत होते आहे:** अलकनंदा हा केवळ एका दीर्घिकेचा शोध नाही तर तो एक संकेत आहे. JWST ने गेल्या तीन वर्षांत जे शोधले आहे ते सांगते की विश्वाचे बालपण आपण समजलो होतो तितके अंदाधुंद नव्हते. काही ठिकाणी अत्यंत सुव्यवस्थित, आणि परिपक्व रचना फार लवकर उदयाला येत होत्या. मंदाकिनीसारख्या grand-design spiral दीर्घिका विश्वाच्या पहिल्या दीड अब्ज वर्षांतच अस्तित्वात येऊ शकतात हे आता सिद्ध होत आहे.

गंगेच्या उपनदीचे नाव मिरवणारी ही दूरची दीर्घिका आपल्याला सांगते की विश्व आपल्या अपेक्षेपेक्षा कितीतरी अधिक विलक्षण आहे. आपले सध्याचे सिद्धांत चुकीचे आहेत असे नाही, पण ते अपूर्ण आहेत. अलकनंदा, आणि तिच्यासारख्या शेकडो शोधांमुळे, ती अपूर्णता कुठे आहे हे आता दिसू लागले आहे. विज्ञानाची हीच रीत आहे: नवीन शोधांनी सांगितले की जुन्या काही समजुती बदलायला हव्यात, तर त्या बदलायच्या.

- **आशिष महाबळ**, पॅसडीना, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## इंदोर व उज्जैन

आम्ही राहतो तो युनाइटेड स्टेट्सचा उत्तर-पूर्व (Northeast) भाग आहे. त्यामुळे तिथे हिवाळ्याच्या महिन्यात बरीच थंडी असते! आमची नात मेघना - बफेलो, न्यू यॉर्कमध्ये Physical Therapy विषयात Doctorate करत होती. तिला नाताळसाठी फक्त दोन आठवड्यांची सुट्टी मिळणार होती. त्या सुट्टीत भारतात जाण्याचा तिचा विचार होता. त्यामुळे आम्ही तिच्याबरोबर जायचे ठरवले.

ह्यावेळेस माझ्या सासऱ्यांनी फ्लॅट विकल्यामुळे तसेच माझ्या भावाची जागा लहान असल्याने आम्हाला मुंबईत रहायला जागा नव्हती. AirBNB पण मिळाली नाही. दादर /शिवाजी पार्क भागात! त्या कारणाने हॉटेलमध्ये राहण्याचे ठरवले. एक आठवडा भारतात प्रवास करायचे व बाकीचे दिवस मुंबईत घालवायचे असे ठरवले.

आम्ही दोघे -पत्नी शीला व मी १५ डिसेंबर मुंबईला जाण्यासाठी निघालो. मुलगी मोना व मेघना २१ डिसेंबरला रात्री मुंबईला पोहोचल्या. आम्ही सर्व दादर स्टेशन समोरच्या एका हॉटेलमध्ये राहिलो.

२४ डिसेम्बरला आम्ही Indigo Airline ने इंदोरला जाण्याचे योजले. त्याआधी डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात Indigo मधील गोंधळामुळे अनेक प्रवाशांची गैरसोय झाली होती. ती सुरळीत होऊन आता त्यांची विमाने वेळेवर उडत होती. त्या कारणाने आमचा जीव भांड्यात पडला!

मुंबईच्या एअरपोर्टवर विमानात प्रवेश करण्याच्या रांगेत उभे असताना दोन जर्मन इसम मला भेटले. एकाचे नाव होते जॉन तर दुसऱ्याचे होते ब्रायन. जॉन पेशाने वकील होता तर ब्रायन हा न्याय खात्यातील एक अधिकारी. ते दोघेही उज्जैन जवळच्या शहरात महेश्वरला एका भारतीय कुटुंबात राहणार होते. एका आठवड्यासाठी! भारताविषयी त्यांचे विचार काय आहेत हे विचारल्यावर ते म्हणाले, त्यांना भारतीय कुटुंबपद्धती फार आवडते तसेच, भारतीय खाणेही!

इंदोर एअरपोर्ट तसा लहानच आहे. तिथून शहराकडे जाणारा रस्ता दुहेरी होता. त्याच्या मध्यभागी मेट्रोचे काम चालू होते. बहुधा आणखी दोन वर्षांनी भरणाऱ्या, उज्जैनच्या सिंहस्थ मेळ्यासाठी ही सर्व तयारी असावी असा माझा अंदाज आहे.

प्रीपेड टॅक्सीने आम्ही इंदोरच्या हॉटेलमध्ये -Fairfield by Marriott मध्ये पोहोचलो. हॉटेल चांगले होते पण परिसर एवढा चांगला नव्हता. इंदोर शहर २०१७ पासून सर्वात स्वच्छ शहर गणले जाते परंतु दुर्दैवाने आम्हाला त्याची प्रचिती आली नाही! बहुधा अमेरिकन चष्म्यातून पाहण्याची सवय झाली होती म्हणून!

इंदोर हे मध्यप्रदेशातील प्रमुख शहर असून विद्येचे माहेरघर समजले जाते. सहा लाख वस्तीच्या ह्या शहरात Indian Institute of Technology तसेच Indian Institute of Management ह्या सारख्या शिक्षणसंस्था आहेत.

पुरातन काळापासून शहराचा उल्लेख 'इंद्रपुरा' असा आढळतो. सन १७२४ पासून शहर होळकर घराण्याचे संस्थान म्हणून ओळखले जाते - मराठा साम्राज्याचे एक प्रमुख संस्थान म्हणून! पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या कारकिर्दीत भारतातील अनेक देवळांचा जीर्णोद्धार करण्यात आला. वेळेअभावी होळकर राजवाडा बघण्याचे राहून गेले.




त्या दिवशी संध्याकाळी '५६ दुकान' ह्या फूड हब ठिकाणी गेलो. परंतु तेथील स्वच्छता बघून तेथील अन्नपदार्थ खाण्यास मन धजावले नाही! फक्त येवले यांचा 'अमृततुल्य ' चहा व Natural चे Icecream खाल्ले.

दुसऱ्या दिवशी सकाळी ब्रेकफास्ट खाऊन हॉटेलच्या कारने उज्जैनला जाण्याचे ठरवले. उज्जैनचे अंतर फक्त ३५ मैल आहे. सन

२०२८च्या आगामी कुंभमेळ्यासाठी (सिहंस्थ) ठिकठिकाणी रस्त्यांचे दुहेरीकरण तसेच पुलांचे काम चालू होते. त्या कारणाने वेळ लागला --१-१/२ तास!

उज्जैन हे क्षिप्रा नदीच्या (जी पुढे चंबळला मिळते) पश्चिम काठावर वसलेले शहर आहे. ही नदी गंगा, यमुना, गोदावरी, कृष्णा नद्यांप्रमाणे पवित्र असून त्यात स्नान केल्याने मोक्ष प्राप्त होतो अशी श्रद्धा आहे. प्राचीन काळात (इ. स. पूर्व ६००) हे अवंतिका नावाने प्रसिद्ध होते. पौराणिक कथांत, उज्जैन बरोबर हरिद्वार, प्रयागराज, नाशिक, इथे अमृतमंथन झाल्यावर, गरुडाकडून अमृतकुंभातून अमृत सांडल्याचा उल्लेख आहे. त्यामुळे इथे दर १२ वर्षांनी कुंभमेळा भरतो!

इ. स. पूर्व ४०० वर्ष काळातील सम्राट अशोकापासून शहराला इतिहास आहे. त्याची दोन्ही मुले -महेंद्र व संघमित्रा -इथे जन्मले .(जे पुढे श्रीलंकेत बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी गेले होते ). पुढे गुप्त काळात (इ. स. ५००) कवी कालिदासाने प्रसिद्ध काव्य 'मेघदूत 'इथेच लिहिले! कवी भर्तृहरी हा उज्जैनचा, तसेच 'मृच्छकटिक' हे शूद्रकाने लिहिलेले नाटकही उज्जैनमध्ये घडलेलं! मंदिर बघता बघता राजा जयसिंहाने (इ स १६८८ -१७४३) बांधलेले 'जंतर मंतर' बघायचे राहून गेले .



उज्जैनमधील महाकालेश्वर मंदिर बघण्यासाठी आमचा ड्राइवरच गाईड होता. त्याने जास्त पैसे भरून आम्हाला V I P दर्शन घडवले. तो दिवस होता ख्रिसमसचा--दिवस सुट्टीचे होते! मंदिरात माणसे कचाकच भरली होती. पिंडीचे दर्शन काही सेकंदापुरते घडले. खरे दर्शन मंदिरातून प्रोजेक्ट केलेल्या स्क्रीनवर पाहायला मिळाले. हे मंदिर १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे!

तिथला कॉरिडॉर जगप्रसिद्ध असल्याने तो बघण्यासाठी निघालो. ह्या कॉरिडॉर किंवा परिसराचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ११ ऑक्टोबर २०२३ रोजी केले. ह्या ९२० मीटर लांब कॉरिडॉरमध्ये १९२ पुतळे , ५३ विविध शिल्पे (Murals) व १०८ स्तंभ आहेत. हे सर्व भगवान शिवाच्या आयुष्याशी निगडित आहेत. त्यामुळे शिवभक्त तसेच कलासक्त ह्यांच्या डोळ्यांचे पारणे फिटणारे आहे!

प्रथम आम्हाला नंदी द्वार लागले. शिवाचे वाहन नंदी सर्वपरिचित आहे. तसेच पिनाकी द्वारही लागले. पिनाकी हे शिवाचे प्रसिद्ध धनुष्य होय! हे धनुष्य भगवान विश्वकर्मा ह्यांनी भगवान शिवासाठी बनवले होते.

आम्ही प्रवासी होतो त्यामुळे रमतगमत सर्व शिल्पे पाहिली. पण शिवाच्या आयुष्याशी निगडित असल्यामुळे शिवभक्त त्यात न्हाऊन निघतील --अध्यात्मात बुडून जातील असा माझा अंदाज आहे!



बाकीची सर्व ज्योतिर्लिंगे पूर्वेकडे तोंड करत आहेत पण इथल्या मंदिराचे तोंड आहे दक्षिणेकडे! दक्षिण ही मृत्यूची दिशा मनाली जाते! भाविक ह्या महाकालेश्वरला पूजतात अशासाठी की अवेळी मृत्यु येऊ नये म्हणून! तसेच आयुष्य उत्तम रीतीने जावे ह्यासाठीही भजतात !

मंदिर व परिसराचा निरोप घेऊन आम्ही इंदोरच्या हॉटेलसाठी निघालो. कारण दुसऱ्या दिवशी वाराणसीचे विमान गाठायचे होते!

- **सुधीर शं कुलकर्णी,** लेथम, न्यू यॉर्क



# द्वंद

“Why me?” हा प्रश्न विचारण्याची वेळ मेधाने केव्हाच सोडून दिली होती. "त्यांचं काय, बरं आहे! राजाराणीचा संसार" अश्या फालतू  कंमेंट्सकडे दुर्लक्ष करण्याचं तंत्र तिने केव्हाच आत्मसात केलं होतं. आपल्याला मूल होणार नाही हे अमरनेही मान्य केल होत. दोघेही आपापल्या करियरमध्ये बुडून गेले होते आणि जास्तीत जास्त यश मिळवण्याच्या प्रयत्नात, आपल्या वाटेला आलेल्या कमनशिबाकडे लक्ष न देता आनंदात राहण्याचा प्रयत्न करत होते. तरीही एखादं गोंडस लहान मूल नजरेला पडलं की मेधाच्या काळजाला धक्का बसायचा.

मेधा आणि अमर दोघेही खूप हुशार होते. एकाच शाळेत, एकाच कॉलेजमध्ये शिकत असताना, एकमेकांशी बक्षिसासाठी  स्पर्धा करताना दोघे एकमेकांच्या प्रेमात कसे पडले ते त्यांचं त्यांनाच समजलं नाही. दोघंही दिसायला चांगलेच होते, घरची परिस्थितीही दोघांची चांगलीच होती. त्यामुळे दोघांनी आपापल्या घरी त्यांच्या प्रेमाची गोष्ट सांगितल्यावर दोन्ही घरातली माणसं  खूषच झाली. "दुग्धशर्करा योगच जुळून आला म्हणायचा," मेधाचे बाबा अमरच्या आईला म्हणाले. योग्यवेळी सगळं काही उरकून घ्यावं असं दोघांचं मत पडल्यामुळे अमरच्या वडिलांनी मेधाच्या घरी जाऊन, मुलांची इच्छा प्रगट केली. मेधाच्या वडिलांनीसुद्धा  जवळचाच मुहूर्त शोधून दोघांची गाठ बांधायचे ठरवले आणि थाटामाटात अमर आणि मेधा एकमेकांचे झाले.

दृष्ट लागेल असाच दोघांचा जोडा दिसत होता. दोघांनाही कॅम्पस interview मधून छान नोकऱ्या मिळाल्या होत्या. एखाद-दोन वर्षांनंतर स्वतःचा धंदा सुरु करण्याचा अमरचा विचार होता. त्याप्रमाणे अमरने स्वतःची छोटीशी  consultancy  सुरु केली होती आणि धंद्यात जम बसेपर्यंत मेधाने नोकरी चालू ठेवायचे ठरवले होते. लग्नाला दोन वर्षे होऊन गेली होती. दोन्हीकडचे आई बाबा आडून आडून प्लॅनिंग नको हं असे सुचवत होते. मेधा आणि अमरनेही प्लॅनिंग करायचे नाही असे ठरवले होते. पण गुड न्युज मिळत नव्हती. अमरने मेधाला तज्ञाकडे जाऊया का असं म्हटल्यावर "चल काहीतरीच काय" असं म्हणून उडवून लावत होती पण तिच्या मनातही अशुभ पाल चुकचुकली होती. त्या दिवशी अमर तिच्या नकळतच इन्फर्टिलिटी डॉक्टरकडे जाऊन आला होता आणि त्याच्यात काही दोष नाही असा रिपोर्ट वाचून त्याचा जीव भांड्यात पडला होता. आता मेधाला डॉक्टरकडे जाण्यासाठी कसे तयार करायचे अश्या विचारात तो होता. पहिल्यांदा मेधाने त्याचे हे सजेशन धुडकावून लावले आणि तिला न सांगता तो टेस्ट करायला गेलाच कसा असा कांगावा केला होता. आणखी एक वर्ष असंच सरून गेलं.  तिच्या ऑफिसमध्ये एका मैत्रिणीसाठी surprise बेबी शॉवर होते. तिला थोडं वाईट वाटलं होत. पण तरीही ती डॉक्टरकडे जायला तयार नव्हती. "आपल्यातच दोष असेल तर" तिने तो विचार धुडकावून लावला होता.

असला प्रॉब्लेम तर असूदे, आपण एखाद बाळ दत्तक घेऊया. योग्य वयात घेतले तर आपल्यालाही कठीण जाणार नाही आणि बाळालाही आई बाबांचे प्रेम मिळेल. अमरचे उत्तर अगदी सोप्प होतं."पण माझ्यात प्रॉब्लेम का असेल" मेधा विचार करून करून थकून गेली होती. ऑफिसातल्या मैत्रिणीला मुलगी झाल्याचे समजल्यावर सगळ्यांना तिच्या बारशाला बोलावले होते. त्या भरपूर जावळ असलेल्या गोंडस चेहेऱ्याच्या बाळाला पाहून आपल्यालाही असेच गोंडस बाळ व्हायला हवे असे तिला मनापासून वाटले आणि तिने तिची इच्छा पूर्ण करण्यासाठी देवाला साकड घातले. घरी आल्यावर ती जरा गप्प गप्पच होती.अमरच्या ते लक्षात आले होते. दोन दिवसांनी त्याने तिला घाबरतच इन्फर्टिलिटी डॉक्टरची appointment घेऊ का असे विचारले आणि दोन तासांनंतर मेधाने ‘हो’ असे उत्तर दिले होते. दुसऱ्याचे बाळ दत्तक घेण्यापेक्षा स्वतःच्या बाळासाठीच प्रयत्न करण्याचा कौल तिच्या मनाने दिला होता.

देवाला नमस्कार करूनच ती डॉक्टरकडे गेली. डॉक्टरची परीक्षा चालू असताना तिच्या हृदयाचे ठोके जरा जास्तच वेगाने चालू होते. आणि आश्चर्य म्हणजे तिच्यातही काही दोष नव्हता. ‘आता पुढे काय?’ या प्रश्नाचे उत्तर डॉक्टरनेच दिले. तुम्हाला IVF therapy try करायची असेल तर प्रयत्न करता येतील. तुम्हाला Ovulation साठी काही औषधे घ्यावी लागतील. त्यानंतर तुमच्या गर्भाशयातून बीजांड काढण्याची प्रक्रिया करावी लागेल. ती थोडी त्रासदायक असते. पण IVF  थेरपीमुळे मूल होण्याचे chances वाढतात. कधी कधी जुळी अथवा तिळी अपत्येही जन्मू शकतात. पहिल्या वेळीच यश मिळेल याची खात्री नाही पण निर्णय तुम्हाला घ्यायचा आहे.

टेस्टट्यूब मध्ये जीव जन्माला आला तर तो तुमच्या गर्भाशयात इम्प्लांट करून नंतर सगळी प्रसूती सुरळीत पार पडते. मेधाला थोडी भीती वाटत होती पण तिने प्रयत्न करायला काय हरकत आहे असं मनाला समजावलं  आणि अमरशी सल्लामसलत करून हा मार्ग स्वीकारायला ती तयार झाली.

तिने घरच्या कोणालाही काहीही माहिती सांगितली नव्हती. अमर आणि मेधा डॉक्टरकडे गेले. दोघंही थोडेसे नर्वस होते. मेधाच्या गर्भाशयातून बीजांड काढणे खूपच कठीण procedure होती. पण मेधा धीटपणे सगळे  सोसणार होती. आपल्याकडे कोणता आत्मा match होईल याची ती आतुरतेने वाट पाहत होती. पण २/३ वेळा procedure करूनही यश आलं नव्हतं. तिचा देवावरचा विश्वास उडू लागला होता. अमर तिला धीर देत होता. पण त्यालाही यश मिळेल अशी खात्री वाटत नव्हती. त्याने मेधाला आपण छोटसं बाळ दत्तक घेऊया म्हणून घाबरतच विचारलं होतं आणि ह्यावेळी मेधाने चक्क होकार दिला होता. दोघं मिळून अडोप्शन ऑफिसमध्ये इंटरव्ह्यू देऊन आले होते आणि वेटिंग लिस्टवर स्वतःचे नावही लिहून आले होते. मुलगा किंवा मुलगी कोणीही अपत्य चालेल असेही बजावून आले होते. काहीही अपेक्षा न ठेवता केव्हातरी फोन येईलच याची त्यांना खात्री होती आणि सहा दिवसानंतर डॉक्टरच्या ऑफिसमधूनच फोन आला. “टेस्ट ट्यूब मध्ये जीव जन्मला आहे आणि we want to implant it in Medha’s uterus” मेधा आणि अमरने एकमेकांकडे पाहिले. आकाशातल्या काळ्या ढगाला सोनेरी कड दिसू लागली होती. त्यांच्या आयुष्याला आशेचा किरण निर्माण झाला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजताची अपॉइंटमेंट होती अमर थोडासा धास्तावला होता. Adoption ऑफिसला काय सांगायचे मेधाने त्याच्या मनातला प्रश्न न ऐकताच ओळखला होता. भगवान के पास देर है मगर अंधेर नही है. Adoption office मधून फोन आला तरी घ्यायचा. एकाला दुसरं भावंड असायलाच हवं. मेधाने अमरला पटवलं आणि रात्री बारा वाजले होते तरी देवाला नैवेद्य दाखवून सगळं काही सुरळीत पार पडू दे म्हणून ती देवाला साकडं घालत होती.

- **कल्पना कीर्तने,** लॉंगवूड, फ्लोरिडा

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका




## संवेदनशील पार्थची गोष्ट



आज मी तुम्हाला बर्मिंगहॅम अलाबामा येथील मराठी शाळेतील एका विद्यार्थ्याची गोष्ट सांगणार आहे. त्याची गोष्ट मला भावली आणि तशीच ती तुम्हालाही आवडेल याची मला खात्री आहे. ही गोष्ट आहे पार्थ सारंग पाटील या मुलाची. शाळेतल्या इतर विद्यार्थ्यांसारखीच पार्थची माझी पहिली भेट झाली. सहावीत शिकणारा पार्थ. मराठी शाळेत शिकतानाही सगळ्या उपक्रमात आनंदाने सहभागी होणारा असा एक गुणी विद्यार्थी.

मुलांच्या भावविश्वात आपण रमत गेलो की मुलांची स्वभाव विशिष्ट्ये, सवयी यांची ओळख पटत जाते. पार्थच्या बाबतीत असेच काहीसे घडले. तो करत असलेल्या कामाबद्दल त्याचे करावे तितके कौतुक कमीच आहे.

११, १२ वर्षाचा छोटुसा पार्थ हा रेस्क्यू कुत्र्यांसाठी फंड जमा करण्याचे काम करतो. बर्मिंगहॅम मधील Birmingham Humane Society साठी त्याचे हे काम चालते. त्याने स्वतः एक website तयार केली आहे.

520-Foundation च्या मार्फत तो rescue dogs/cats साठी donation गोळा करतो. दर महिन्याला जितकी शक्य होईल तितकी रक्कम जमा करण्यासाठी त्याची धडपड असते. त्यासाठी पार्थ त्याच्या नेबरहूडमधील काही कुत्र्यांसाठी डॉग वॉकरचे काम करतो, त्याची पिगी बँक असो किंवा कोणीही त्याला दिलेली भेट असो ते सारे या NGO मधील कुत्र्यांसाठी फंड वाढवण्यासाठीच तो वापरत असतो. लहानपणापासूनच पार्थला कुत्र्यांची विशेष आवड. त्याची ही आवड त्याच्या आई बाबांनीही जपली. NGO मधून एक रेस्क्यू डॉग पार्थ व त्याच्या भावंडांसाठी ते घेऊन आले.

मुलांना नवीन सोबती व त्या कुत्र्याच्या पिल्लाला घर मिळाले होते. सगळेच एकमेकांमध्ये गुंतलेले असतानाच दुर्दैवाने पार्थच्या पाळीव कुत्र्याचे निधन झाले. घरातील पाळीव प्राणी जाणे हा त्या

संपूर्ण कुटुंबातील व्यक्तींवर प्रचंड आघात असतो. सारे कुटूंब या वेदनेतून जात होते.

पार्थला तर ह्या गोष्टींचा खूप त्रास झाला, पण इथेच पार्थचे वेगळेपणही जाणवले. त्याने त्याच्या लाडक्या कुत्र्याला श्रद्धांजली म्हणून NGO तील कुत्र्यांसाठी फंड जमा करण्याचे काम सुरू केले आणि ते आतापर्यंत चालूही ठेवले आहे. पार्थशी त्याच्या कामाबद्दल बोलताना इतक्या लहान वयातली त्याची ही समज, भूतदया आणि त्यासाठी स्वतः कष्ट करण्याची त्याची धडपड बघून मी तर हेलावून गेले.

माणसांसाठी डोनेशन जमवणारे खूप आहेत पण प्राण्यांसाठी डोनेशन जमवणाऱ्यांची संख्या कमी आणि इतक्या लहान वयात हे करणारे तर विरळच. पार्थ हा त्यात मोडणारा आहे आणि म्हणूनच तो खास आहे.

मुलांमध्ये तदनभूती (Empathy) कशी रुजवायची, टिकवायची हा नेहमीच शिक्षकांना, पालकांना पडणारा प्रश्न असतो. मुलांच्या संवेदनशीलतेला ओळखून तिला खतपाणी घालून ती वाढीस नेण्याऱ्या पालकांची संख्या वाढणे गरजेचे आहे. पार्थच्या मनातील ही संवेदना जपणाऱ्या पार्थच्या पालकांचेही खूप खूप कौतुक.

समाजाच्या अनेक घटकांना मदतीची गरज असताना आपापल्या परीने शक्य होईल ती मदत करत राहणे याचे संस्कार घरातून, शाळेतून घडत रहावेत. समाजाचे देणे देत राहावे हे होणे गरजेचे आहे. पार्थची ही गोष्ट ऐकून त्याला जमेल तशी मदत करायची संधी आपण सोडू नये यासाठीची माहिती खाली देत आहे. पार्थ करत असलेल्या कामाचा आम्हा सगळ्यांना अभिमान आहे.

त्याच्या या आगळ्या वेगळ्या कामासाठी पार्थला खूप खूप शुभेच्छा आणि प्रेम.

शब्दांकन – **कल्याणी आणि पराग सोहोनी**

संकल्पना - मराठी शाळा बर्मिंगहॅम, अलाबामा, USA




## श्री गजानन महाराज प्रकटदिन सोहळा २०२६ वृत्तांत

**माघमासी सप्तमीस | वद्यपक्षीं शेगांवांत |**
**तुम्ही प्रगटला पुण्यपुरुष | पंथाचिया माझारी ||२१||**



महाराष्ट्रातील थोर संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज, माघ वद्य सप्तमीला भक्तांच्या उध्दारासाठी शेगांव येथे प्रकट झाले. तोच दिवस श्रींचे भक्त प्रकटदिन म्हणून साजरा करतात. ह्या वर्षीही श्री गजानन सेवा, बे एरीया या सेवाभावी संस्थेने श्रींचा १४८ वा प्रकटदिन ८ फेब्रुवारीला तिथीने आणि त्यानंतर शेगावचा उत्सव पार पडल्यावर १४ फेब्रुवारीला सार्वजनिकरित्या साजरा केला. ह्यावर्षीच्या उत्सवात अनेक नाविन्यपूर्ण गोष्टींचा समावेश होता आणि त्याच अभूतपूर्व उत्सवासंदर्भात हा वृत्तांत.

**होते संग्रही पुर्व पुण्य म्हणुनी हा सद्गुरु भेटला।**
**ज्याने अज्ञजनाशी पार करण्या सन्मार्ग तो दावीला।।**

खरोखरच आपणा सर्व भक्तांची पूर्वपुण्याई म्हणूनच आपल्याला इथे सातासमुद्रापार राहूनही श्री महाराजांच्या मनोहारी रूपाचे दर्शन घेता येते आणि त्यांच्या चरणी काहीतरी सेवा करण्याची संधी मिळते. त्यामुळे सर्वप्रथम उत्सवात सहभागी झालेल्या प्रत्येक भक्ताचे मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार. ८ फेब्रुवारी रोजी महाराजांचा येथील स्थानिक तिथीने प्रकटदिन होता. ह्या दिवशी सकाळी भूपाळी, श्रींचा उत्सवानिमित्य खास श्रृंगार आणि नामस्मरण झाले. ह्यावर्षी प्रथमच प्रकटदिनाचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. ह.भ.प. सौ. सोनालीताई फडके यांचे प्रकटदिनाचे कीर्तन झाले. श्री अमृतराय रचित संतसंगाचा महिमा सांगणाऱ्या खालील अभंगावर त्यांनी नारदीय पध्दतीचे अतिशय सुश्राव्य कीर्तन सादर केले.

**संत पदाची जोड दे रे ।**
**हरि साधु पदाची जोड ॥धृ ॥**
**संतसमागम आत्मत्वाचा**
**सुंदर उगवे मोड ॥१॥**
**सुफलित करुनी पूर्ण मनोरथ ।**

**पुरविशि जिविंचे कोड ॥२॥**
**अमृत म्हणे रे हरि भक्ताचा ।**
**शेवट करिसी गोड ॥३॥**

माध्यान्ही श्रींचा महानैवेद्य आणि आरती झाली. श्रींच्या प्रकटदिनी संध्याकाळी रुद्रयागाचे आयोजन केले होते. अतिशय प्रसन्न आणि भक्तिपूर्ण वातावरणात लघुरूद्राच्या आवर्तनात अभिषेक, होम झाला आणि नंतर पूर्णाहुतीसह यागाची सांगता झाली. त्यानंतर आरती, श्रींचा नैवेद्य होऊन सर्व भक्तांनाही प्रसाद वाटप करण्यात आले. रविवार असल्यामुळे सकाळपासूनच मोठया प्रमाणात भक्तांनी श्रींच्या दर्शन आणि प्रसादाचा लाभ घेतला.

दरवर्षी प्रमाणेच, तिथीनुसार प्रकटदिनानंतर येणाऱ्या शनिवारी म्हणजे १४ फेब्रुवारीला सार्वजनिक भव्य स्वरूपात प्रकट उत्सव साजरा झाला. ह्या वर्षी ३६०० लोकांनी ह्या उत्सवासाठी RSVP केल्या होत्या. साधारण ऑक्टोबर महिन्यापासूनच प्रकट दिनाच्या नियोजनाला सुरुवात होते. २८ गटांमधून ३५० पेक्षा अधिक सर्व वयोगटातील सेवेकऱ्यांनी उत्सवात सेवा दिली. येणाऱ्या प्रत्येक भक्ताला महाराजांचे व्यवस्थित दर्शन आणि प्रसाद मिळावा आणि उत्सवाचा आनंद घेता यावा ह्यासाठी ते झटत असतात.



पहाटे प्रसन्न वातावरणात भूपाळीच्या मंगल सुरांनी प्रकटदिनाला प्रारंभ झाला. कार्यक्रमाची रुपरेखा कार्यक्रमापूर्वीच जाहीर केल्यामुळे भूपाळीपासूनच मंदिरात येणाऱ्या भक्तांची संख्या वाढत होती. दोन दिवस आधीपासूनच श्रींच्या मुर्तीचा सभोवताल सुशोभित करण्यास सुरुवात झाली होती. खऱ्या फुलांनी केलेली ही सजावट आणि मोरांचा पिसारा फुलविणारे दृश्य ह्यावर्षीचे वैशिष्टय होते. उत्सवातील श्रृंगार झाल्यानंतर माऊलीचे रुप खूपच मनोहारी दिसत होते. सकाळची आरती आणि नैवेद्यानंतर पालखी सोहळा झाला. उत्सवासाठी श्रींची पालखी फुलांनी खूप सुंदर सजविण्यात आली होती.

सुवासिनींच्या औक्षणानंतर ह्यावर्षी पालखी सोहळ्याची सुरुवात संकीर्तनाने झाली. त्यानंतर लहान मुलांचा टाळ, मोठ्यांचा टाळ आणि ढोलताशा पथकाचे सादरीकरण झाले. नंतर भगिनींनी ढोलताशावर लेझीम खेळून आनंदोत्सवात भाग घेतला. सुवासिनींच्या औक्षणाने पालखीचे मंदिरात पुन्हा स्वागत झाले. त्यानंतर श्रींचा महानैवेद्य झाला. ह्यावर्षीचे उत्सवातील आणखी एक वैशिष्टय म्हणजे पेटी, तबला आणि मृदुंगाच्या साथीत प्रांगणात सामुदायिक महाआरती झाली.

गर्दी होऊ नये म्हणून भक्तांना दोन सभागृहात विभागले होते. तेव्हाच 'Temple Initiative' ह्या महाराजांच्या मंदिराच्या संकल्पनेबद्दल माहिती देण्यात आली. त्यानंतर भक्तांना महाप्रसाद देण्यात आला. वृध्दांसाठी खास पंगतही होती. भक्तांकडून मिळालेला शिधा सामुग्री वापरुन महाप्रसाद गटातील अन्नपूर्णांनी मसाले भात, बटाटा भाजी, शिरा, रायता आणि ठेचा असा संपूर्ण सात्विक प्रसाद एवढ्या भक्तांसाठी बनविला होता. सर्व भक्तांनी ह्या प्रसादाचा लाभ घेतला.



महाआरतीनंतर प्रत्येकाला ओढ असते ते माऊलीचे उत्सवातील रुप पहायची. एवढ्या भक्तांना कुठलाही त्रास न होता, अगदी शिस्तीत दर्शन घेता येईल ह्यासाठी जागोजागी सेवेकरी मदतीला होते. वृध्दासांठी वेगळ्या रांगेचे नियोजन होते.

ह्यावर्षीही 'Zero waste' mission राबविले गेले आणि त्याप्रमाणे खरोखरच सर्व भक्तांनी सहकार्य करुन हे mission यशस्वी केले. सकाळपासून संध्याकाळपर्यंत सर्व भक्तांना नियोजित पार्किंगच्या जागेपासून कारने मंदिरात आणून, त्यांच्या पादत्राणाची ही उत्तम व्यवस्था राखून, पालखी, दर्शन, भोजन तसेच प्रत्येक कुटुंबाला भेटवस्तू देऊन परत त्यांच्या कारकडे नेण्याची सर्व व्यवस्था सेवेकरी आनंदाने पार पाडत होते.

कुठेही गोंधळ, गडबड किंवा नासाडी होऊ नये ह्याची प्रत्येक सेवेकरी जातीने दखल घेतो. त्यामुळे आलेले भक्त ह्या आदरातिथ्य आणि आपुलकीने भारावून जावून त्यांना शेगावचाच अनुभव आल्याची पावती देतात. रात्री फुलांच्या पायघड्या घालून श्रींची दृष्ट काढली गेली, निरोपगीतही म्हटले गेले.

मंद दिव्यांच्या प्रकाशात शांत वातावरणात भारावलेल्या स्वरांनी श्रींची शेजारती झाली. कोणाचाच मंदिरातून पाय निघत नव्हता, माऊलीचे ते शांत रुप सर्व भक्त डोळ्यात साठवून घेत होते. प्रत्येकाचे डोळे पाणावले होते. जड अंतःकरणानेच प्रत्येकजण मंदिरातून निघाला. जय गजानन! 🙏🙏

**श्रींच्या उत्सवाचे कौतुक भक्ताच्या लेखणीतून**







https://www.zeffy.com/en-US/ticketing/reshimgathee-meet-up-atlanta

**The BMM B-Connect AI Summit 2026** offers a uniquely concentrated, *"high-impact, fast-paced, globally aligned"* platform for anyone looking to shape the future of AI.

Please provide your interest today by signing up at: https://forms.gle/EEsZcxmkj866C35G8

**Join the Movement — Volunteer for BMM B-Connect!**

Hurry Up and Sign up at: https://forms.gle/8EiYnocoLBbyVPyFA

**Medical Internship (India) for the Pre-Med Students:**

Please sign in and provide your interest at: https://forms.gle/ZvuqzZZfB6pH5hs39

For any additional information please contact: Anand.Chouthai@bmmonline.org **or** 732-425-7591


AUGUST 6th, 2026 | SEATTLE, WA
BMM BConnect
AI SUMMIT 2026
AI for All: People | Planet | Progress
Keynote Sessions
Industry Deep Dives
Sustainability Panel
Women in AI Leadership
AI + Cybersecurity Shark Tank
Startup Pitches & Innovation Awards
Hands-On Worksnops
Hands-On Workshops
Generative AI & Agentic AI
Launching
BMM AI INNOVATION NETWORK (BAIN)
Connecting Global Minds
Join us to Shape the Future of AI!
✓ Responsible AI & Governance
✓ Cross-Border Innovation
✓ The Future of Work
https://bmmonline.org/bconnect | Anand.Chouthai@bmmonline.org
732-425-7591




A Growth Workshop for Established Founders Ready for Their Next Orbit


## BMM BConnect introduces "Second Orbit" for North American Founders.

### The Faculty:



**DR. ANAND DESHPANDE**

Founder & Chairman
Persistent Systems
Linkedin Profile



**RAJ JOSHI**

Lecturer, Stanford Graduate School of Business
Co-founded, Infosys Consulting & Enterprise AI Startup
Linkedin Profile

Register Now

**May 01 & 02, 2026**
**Venue : Stanford University, California**

**Workshop Fees (May 2026 Session)**
**Early Bird ( April 10th) : $1000**
**Regular (After April 10th) : $1250**

For additional information, please contact:
Anand.Chouthai@bmmonline.org | +1 (732) 425-7591

### Two-Day Growth Workshop Highlights:

- Growth Strategies: Actionable plans for scaling your organization.
- Unlock Potential: Tap into hidden opportunities.
- Culture of Growth: Foster innovation and improvement.
- Overcome Challenges: Tackle bottlenecks to scale.
- Expert Insights: Leverage experience with large organizations.

- For successful business founders with $1M+ yearly revenue
- Grow to next level
- Close group interaction
- Limited slots



BMM
MEDICAL INTERNSHIP /
SHADOW PROGRAM IN INDIA
July – August 2026
1-4 Week Internship / Shadowing Opportunities
Placement Based on Student Preferences
Accommodation Assistance Available if Needed
Safe Learning Experience, Gain Hands-On Insight!
Limited Spots – Apply Now!
Nominal Admission Fee | Students Arrange Own Travel
If interested – please fill out the form at
https://bmmonline.org/arogyasampada/


VOLUNTEERS SIGN UP!
for
BMM Bconnect Initiative
& Convention
August 2026
Seattle
BMM VOLUNTEER
Sign Up Today!
Event Support
Registration
Hospitality Team
VOLUNTEER
Join the Team!


AVANA
SENIOR CARE
Pune, India
PEACE OF MIND FOR YOU & YOUR LOVED ONES
Professional senior care with a personal touch.
Co-Founded by Ms Niharika
MHA- Mount Sinai Hospital, NY
Senior Living Mgt - Cornell University, NY
SERVICES WE OFFER
Independent Living
Assisted Living
Day Care
Wellness & Rehabilitation
Medical Support & Emergency Management
Pet Therapy & Companionship
TRY BEFORE YOU DECIDE
BOOK A TRIAL STAY TODAY!
+91 9090070782
avanaseniorcare.com

We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue. The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.



***Party Time***
**Artist: Shubhangi Mantri**
Dimensions: 22"x30"
Medium:Watercolor
Price:$350
Mandal: DFWMM



***Water lily***
**Artist: Alka Vaidya**
Dimensions:
Medium: Acrylic on canvas
Price:$300
Mandal: EBMM




***"What about me?"***
**Artist: Avi Sadhu**
Dimensions:16"x20"
Medium: Watercolor
Price: Not for Sale
Mandal: MMLA



***Buddha***
**Artist:Vinita Mohite**
Dimensions: 11"x14"
Medium:Oil on canvas
Price:$350
Mandal: Seattle MM



***Warm winter moments***
**Artist: Aparna Deshpande**
Dimensions:9"x 11"
Medium: Ink and watercolor
Mandal:Marathi Vishwa NJ



**Artist: Radha kirtane**
Dimensions:9.5" x 9.5"
Medium: Pastels and colored pencils
Price:Not for Sale
Mandal: Tennessee Marathi Mandal

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*The buyer is responsible for shipping and handling.